ळाविनायकग्रंथमाला.

फुलांचे झेले.

अथवा

स्फुटकाव्यसंग्रह.

लेखक—बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.

मुरुड जंजिरा.

किंमत ६ आणे.

श्रीबल्लाळविनायकग्रंथमाला, प्रथांक ४.

फुलांचे झेले.

अथवा

स्फुटकाव्यसंग्रह.

हे

रा. बाळकृष्ण अनंत भिडे, बी. ए.,

यांनीं रचिले,

ते

रा. चिंतामण अनंत जोशी,

यांनीं आपल्या

'श्रीबल्लाळविनायक' छापखान्यांत छापिले.

मुरूड—जंजिरा.

फाल्गुन, शके १८३०.

किंमत सहा आणे.

॥ सदभ्यर्थना. ॥

(शार्दूलविक्रीडित.)

बोला सुज्ञ न हो! 'असाधु कथनें आणीं न साधूत रे!'
देवार्चाकुसुमांत कां तरि तुह्मी हे घेतसां धूतरे ?
आहे प्रस्तुत वस्तु निर्गुण जनीं निर्दोष वा कायसें ?
कट्वाम्लादि रसां बहिष्कृत कधीं केलें कुठें पायसें ? १

झाले, होतिलही पुढें, शुचि कवी सारज्ञ दिव्यप्रभ,
कांहीं सांप्रत ही मही मिरविते श्रीशारदावल्लभ.
त्यांच्या स्वादुसुधाफलांत बुधहो! हें मांडलें दोडकें,
प्रेमानें रुचिपालटास्तव तरी सेवाल हें थोडकें. २

आत्मा रंजविण्यास काव्य रचिलें कांहीं बुरें वा भलें,
त्यानें लेखनकौतुक प्रकट हें कांहीं फळा लाभलें;
त्याचा अल्पविभाग अर्पित असें, मानूनि द्या चोखट,
जो चौघांसह घांस सेवित असों, तो घे चवी चौपट. ३

विषयानुक्रम.

एकूण पद्यसंख्या ५५८

फुलांचे झेले.

१, ईशस्तवन.

पद.

सच्चिन्मूर्ते ! विश्वकारणा ! सृष्टीच्या चालका !
दावीं सत्पथ या बालका. । ध्रु० ।
' अतर्क्य महिमा तुझा असे, ' हें वेदवृंद बोलला,
माझा पाड किती लागला !
निर्गुण किंवा सगुण असासि तूं, वाद गहन हा भला,
मला तो व्हावा कां दुर्बला ?
मज दिसे भोंवतीं सर्व तुझी ही कृती,
रविविधुग्रहादि त्वद्यश आलापिती,
हा निसर्गदर्पण दावी तव आकृती,
करुणावरुणालया ! भक्तिनें नमवीं मी मस्तका,
दावीं सत्पथ या बालका. १
अक्षय तेजा ! अगाध शक्ते ! इच्छा तव आकळी,
अनंता भुवनांची सांखळी;

सजीव तैशी अजीव सृष्टी वागविसी तूं बळी,
सकळ हीं रूपें तव आगळीं;
तूं ग्रीष्मीं पल्लव देतोसी तरुलते,
दलही न कधीं तव इच्छेविण हालते,
तव कृपा शिळेंताहि मंडूका पाळिते,
यथार्थ तूंतें वर्णन करणें प्रभो ! असे शक्य का ?
दावीं सत्पथ या बालका. २

फलित तरुवरी विहंगगण जो आलापा सोडतो,
तो तव रूपाशीं जोडतो;
मेघध्वनि जो परिसुनि जळधी रोषानें गाजतो,
तोही रूप तुझें साजतो;
मग तुझी कल्पना जरी मनीं बाणते,
तरि शब्दरूप तिस कोण कुशल आणतें?
तव समान कवि जो, तोच करिल काज तें,
मी तों केवळ अल्पविषयमति, हे भुवनव्यापका !
दावीं सत्पथ या बालका. ३

२, बाळपणाचें चित्र.

साक्या.

बाळपणाचें चित्र मनाला अनुपम दे आनंद,
बालक्रीडा काय मनोहर ! परोपरीचे छंद ! १

स्वेच्छ विहरणें, बागडणें, ते अश्वरथाचे खेळ,
बालिश परि ते दवडित होते सुखप्रमोदीं वेळ. २

हरिततृणाच्छादित भूमीवर फलककंदुका हातीं
धरुनि, खेळलों खेळ मजेनें, वर्णवते न अहा ! ती. ३

अंतराळिं ज्या काळीं करितो मंद पवन सुखलास्य,
पतंग उडवूं जाईं तेव्हां, खेळे मम मुखिं हास्य. ४

परिस्थितीचें धोरण राखुनि कारस्थानी जेवीं
राज्यसूत्र तो चालवितो, मी पतंगसूत्रा तेवीं. ५

वातावरणीं उंच सेवितां नर्तनरंग पतंग,
अंतरंग मम दंग होउनी उठती मोदतरंग. ६

उपवनभागीं बालतरूंच्या रम्य लावुनी हारी,
उल्हासानें सिंचन केलें विमल निदाघीं वारी. ७

खालीं गेलें किती मूळ हें पाहें उपटुनि तरुस,

किती वेळ मीं असा दाविला अल्पबुद्धिचा कळस. ८

तत्परतेनें फुलें वेंचणें, धरणें चपल चतूर,
गोवत्साशीं नित्य खेळणें, धावुनियां तुरतूर. ९

वसंतसमयीं येतां तरुवर सुगंधि पुष्पबहार
मातापितरां गुंफुनि दिधले हर्षानें फुलहार. १०

कोकिलकोमलगानरवानें भरितां तें उद्यान,
किती वेळ मी भान विसरलों होउनि बद्धध्यान. ११

असें अंगणीं सायंकाळीं, सेवुनियां उत्सुकते,
आश्चर्यानें पहात टकमक नभांत विधुतारांतें. १२

लाड करोनी पुरवित होतीं कोड आमुचीं पितरें,
जननिप्रीतिजसौख्यसाम्य तें कसें साधणें इतरें? १३

विश्वाच्यां विस्तारविचारा बालमति न ती सहते,
विस्तृत भासत होतें अह्मां स्वल्प आमुचें गृह तें. १४

स्वजनगृहाचा साचा होता वसत मनीं अभिमान,
हर! हर! त्यातें आज न मिळतें हृदयीं अल्प स्थान. १५

किती तरी तें बाळपणीं या घडतें ज्ञानार्जन हो!
विषय कसाही असतो तेव्हां शिशुमतिला वर्ज न हो! १६

वनस्पतींचें ज्ञान पाहिजे; व्हावाही व्यवहार,
पदार्थशास्त्रहि शिकणें आहे; नाहीं शिक्षण पार; १७

प्रेमनीतिचे पाठ शिकविते प्रेमभरानें आई;
शास्त्रें इतरें निसर्ग निरलस नित्य पढवितो पाहीं. १८

वस्तू देते प्रत्येक मना प्रमोदसच्छिक्षण ही;
ज्ञानार्जनविण विफल न जातो एक शिशूचा क्षणही. १९

मतिचें गेलें चापल्यहि तें, गेला तो उत्साह;
भोळेपण तें मावळलें, ही चिंता करिते दाह. २०

आनंदसुखीं निरुपद्रव तो काळ आमुचा गेला,
श्रमप्रफुल्लित वदनचंद्रमा नित्य असे रंगेला. २१

प्रत्येक क्षण झाला आह्मां देता मोदाश्चर्य,
आयुष्यप्रारंभ सुखद, जणुं वत्सरमुख ऋतुवर्य. २२

लपंडाव वा कावा ठावा नव्हता तो चित्ताला,
सरळ वर्तनीं, निर्मळ जळसम, तिळ स्थळ न पापाला. २३

लोभें डसुनी भरिलें नव्हतें मनांत हाळाहळ तें.
द्वेष न चित्ता क्षणही शिवला, ज्यानें वर्तन मळतें. २४

अनंत चिंता करित न तेव्हां व्याकुळ चित्ता होत्या,
दुष्ट मत्सरें नव्हत्या केल्या बुद्धि आमुच्या कोत्या. २५

सहज सरस सुखपूर्ण पूर्विचा गेला गेला काळ.
हाय ! अतां हा धाय मारितो संतत भव विक्राळ. २६

बाळपणींच्या अंतरलों मी हंत ! सुखक्रीडांतें,
त्यांचें आतां स्मरण मनोहर हर! हर! केवळ घडतें. २७

३, आईनें केलेलें

मुलांचे कौतुक.

तोटक वृत्त.

पतिलोभरसें प्रणयव्रतती
  उजरे, धरि उन्नत्तिचें व्रत ती;
जडलें तिस हें फळ सुंदरसें,
  सखि ! पक्क, रुचीकर, तुंद रसें. १

छबडें मम सर्व असे धन हें,
  हृदया मृदु नाजुक बंधन हें;
जरि नाजुक बंध फुलासम हा,
  तरि दे हृदयास बलास महा !

जरि जीव लहान सखे ! गमतो,
  सदनाश्रय होय मनोरम तो.

शिशुमूर्ति लघू, परि हीजवरी
  झुलतांचि अम्ही भ्रमरभ्रमरी. ३

चिमणा विखरी सुख हा भंवतें,
  मज भूकतहान न जाणवते;
मम वृत्ति समस्त इथें रमती,
  विसरे दुसरें तइं भान मती. ४

ऋजु नासिक, वर्तुळ तोंडवळा,
  नयनांतिल निस्तुळ दीप्तिकळा,
मुख मुग्धमनोरमता मिरवी;
  तिकडीलचि हा वळणा गिरवी. ५

कमलोपम लोचन, वर्ण भला,
  शुचि भाळ विशाळ, भुजा सरला;
तिकडील शिशूपणचेंच गडे!
  जणुं रूप नवें नजरेस पडे! ६

किति देह मऊपण भासवता!
  जणुं रेशिमचेंडुच हा सवता!
मृदु चंचळ जावळ भुर्भुरतें,
  बघुनी स्वमनीं चमरी झुरते! ७

शुचिगौरशिरश्चलनावसरीं

लघु पिंपळपान लखाक करी;
भंवती कच कोमल चांचरती,
जणुं त्याजसवें झगडा करती ! ८

धरि भाळ, कपोलहि, कृष्ण टिळा;
कनकाद्रिशिरीं जणुं नीळशिळा!
रमतां चिमणा मृदुहासरसीं
विकसे नव पद्म सुधासरसीं. ९

नयनीं चमके किति चापळ ! ते
जणुं मीन जळीं रमती पळते!
मधुरास्फुट तन्मुख जें वदतें,
मज होय अनंतसुखास्पद तें. १०

दुडु रांगत हा भ्रमणाचि कला
नुकता चपलांग असे शिकला.
सहसा निसटून, हंसून, पळे,
मज घाबरवी वरवी, न वळे. ११

कधिं आणुनि डौल करां चरणां
जणुं टाकित, मोजित तालगणा;
वळवून मुखा परि पाठिवरी
वनकेसरिची परिपाठि वरी. १२

गुडघे, कर, मस्तक, केस, गळा,

भरुनी निजदेह रजें सगळा.
मम अंकतळीं घुसुनी निकरीं,
वसना मळवी, मन फुल्ल करी. १३

किति धूळ मुखावरती उधळी !
अमृतांशु लपे जळभृत्पटळीं !
अथवा उदयीं रविमंडळ तें
कवळून धुकें स्वकरीं मळतें. १४

बघतां बघतां नयना चकवी;
ठकतो बघता शिशुनाच कवी.
हुडकीं जरि मी, गवसे न, मग
कटिकिंकिणिनाद करी उमग. १५

उदयीं घुसळीं नवनीत, तरी
पुढतीं बसुनी रविदोर धरी;
जणुं देवकिचा सुत अष्टम हा
हरि संहरितो मम कष्ट महा. १६

जलपात्र बघून, तयावरती
जडते बहु बालविनोदरती;
जलताडनचालित अंबुकणें
नटवी तनुला जणुं मुक्तगणें. १७

जलबिंदु जयाभंवतीं खुलती,
मुख तें बघुनी नयनें भुलतीं;
भरतें हृदयाब्धिस येत महा,
दिसतां उडुवेष्टित चंद्रम हा. १८

कधिं दीपशिखेवरि झेंप करी,
अलिसा नलिनीकलिकेउपरी;
करितांच निवारण मी, पळतो;
दुखवी, सुखवी, मजला छळ तो! १९

क्षण एक सुखीं स्वसुखीं स्तन घे,
मग मद्वदना क्षण एक बघे;
अरुणोष्ठ पुढें स्फुरतां, हंसतां,
अरुणाब्ज दिसे जणुं उल्लसतां. २०

रदनांकुर भूषविती वदना,
गमतें मणिमांदुसतुल्य मना;
बघतां न पुरे मनिंची उकळी,
रुचि अद्भुत येइ पळानुपळीं. २१

इतुक्यांत कपोलतलावरती
स्तनजातपयःकण पाझरती;
जणुं जन्हुसुता जलबिंदु खरी
कदलीकनकाभदलीं विखरी!, २२

करितां स्तनपानहि एक करीं
कवळून गळ्यांतिल एकसरी,
मृदुलांकुरसन्निभ अंगुलि त्या
मज हांसविती गुदुल्या करित्या. २३

हंसतां, करितां चिमणें सलगी,
पडते सुकपोलतलीं खळगी,
जणुं चंद्रम पूर्णकला वरतो,
हरिणांक विराजतसे वर तो २४

असतां सदनीं तिकडे, सखये!
छबड्यास महोत्सव सन्मुख ये.
लाडिवाळपणें उसळे, खिदळे,
करि अंगलटीस गुलाम बळें! २५

तिकडे बिलगे, मग हा मजला
बिलगे, पळण्यास पुन्हां सजला;
कलहंससुदंपतिमध्यग हें
जणुं हेलवतें दलदब्ज महें! २६

प्रतिवारहि दृष्टिस काढितसें,
तरि चित्त सये! भय पावतसे.
प्रभु यास सुखांत सदा वसवो,
शुचि उन्नत हा कृतिला प्रसवो! २७

४, मृत मातेच्या तसबिरीकडे बघून गहिंवरलेला कवि तीस उद्देशून म्हणतो.

[१]

जरी ओष्ठ हे आतां वदतिल मृदु शब्द सुधासार,
हर्षभरें मन निर्भर भरुनी, होइल जननि! बहार! १
अंतकाळिंचें तव वच परिसुनि झाले दिन गे! फार,
तेव्हांपासुनि विकल असें मी दुःखांनीं अनिवार. २
वचनसुधेची तुझ्या लागुनी अपरंपार तहान,
भवीं भयार्णी भ्रमतें मन, मृग जणूं वनांत लहान. ३
प्रेमखनी जें समाधानसुख बाळपणीं मज वितरी,
धीर देउनी, सुबोध करुनी, व्यसनपार जें उतरी, ४
तेंच मृदु स्मित मुखावरी या प्रतिमेमाजिं विराजे,
धवल चंद्रिका प्रफुल्ल कुमुदाकरीं बरी जणुं साजे ! ५
प्रेमपूर्ण तें सौम्य सुखप्रद नयनीं बघुनी पाणी,
वाटे प्रतिमा मूर्तिमंत ही तुजला परतचि आणी. ६
धन्य असे ही चित्रकला, मम थक्क मानसा करिते !
धन्य धन्य ही समस्तभक्षक काळकरा आवरिते ! ७

[२]

तुझा जाहला अंत तेधवा हंत ! अंतरीं जळलों,
जननी ! स्वमनीं नवनीतासम दाहें मी विरघळलों. ८

कंठ दाटुनी, मन्नयनांतुनि खळ खळ खळ जळ गळलें,
प्रेमतरंगिणि ! माते ! तूं असे काय तें कळलें ? ९

व्यसनकर्दमीं गर्द शैशवापासुनि हा जो रुतला,
निराधार त्या बाळाकरितां तव जीव न का गुतला? १०

त्वज्जीवानें दुःखभरानें जातांना मजसाठीं
अश्रु ढाळिले असतिल; जाणें तुझी प्रेमपरिपाठी. ११

मला कदाचित अवचित जीवें असेल तव चुंबीलें,
घिरट्या घालित असेल वा मजभंवतीं तो, शिवशीले! १२

स्मितच्छटा ही मुखावरिल तव ह्मणे ‘ सत्य अनुमान ’.
हें न स्मित, परि मूर्तिमंत हें प्रेम, न ज्या उपमान! १३

[३]

नेलें जेव्हां तव शव, तेव्हां सोडुनि दीर्घ उसासा,
तळमळलों मी जसा जलाविण दीन हीनबल मासा. १४

मुख झांकीलें हस्ततळांनीं, अंतर दुःखें तुटलें,
थोर हुंदका येउनि, माझें धैर्य सर्वही सुटलें. १५

रडत रडत मी मनामधें तव घेऊनि निरोपाला,
काळजांत या काळजिच्या मीं रोंवियलें रोपाला. १६

आतां जेथें गेली असशी, स्थळीं न त्या शोकातें
जागा लवही, वियोग जाळी न कुणाही वा मातें ! १७

संततमंगलधाम असे तें, चिन्मय पुण्यस्थान,
भवदु:खांच्या वाऱ्यांना अवकाश नसे अणुमान. १८

स्थळीं त्याच जरि भेटेन तुला तरी पुन: हे ओष्ठ,
कधींकधींही न वियोगाची वदतिल आई! गोष्ट. १९

[४]

मला अर्भका त्यजिलें त्वां ही मना न वाटे खात्री,
तयास लागे ध्यास तुझा मग आई गे ! दिनरात्री. २०

पुन:पुन्हा मन उमळे, कढ ते दु:खाचे नाकळले,
मत्स्थिति देखुनि सर्व लोकही शोकभरें कळवळले. २१

कोणी ह्मणती, 'उगा रहा गा! आई येइल परती.'
हें परिसोनी मोधाशेला आली त्वरितचि भरती. २२

मला वाटलें खरेंच सारें, सान मुलाला काय !
निर्मल जलसम चित्त, न ठेवी त्यांत पापलव पाय. २३

उत्सुकतेनें वाट पाहिली प्रतिदिवस तुझी माय !

प्रतिदिवशीं परि झाला माझा हिरमोडाचि गे हाय! २४

ज्याचा मजला ध्यास, मिळेलचि तें, हा दृढ विश्वास,
निराश होउनि, हंत! टाकिले संतत परि निःश्वास. २५

अशा रीतिनें बाल्यापासुनि आशेनें ठकवीलें,
'आशेंत वसे दुःख सदोदित,' काळानें शिकवीलें. २६

'उद्यां परत तूं येशिल,' ह्मणुनी गेले अपार वार,
मनोभंग मम संतत होउनि उदास झालों फार. २७

अंतीं झालों स्वस्थ ठेवुनी दैवावरी हवाला,
बाल्यसुलभ जें समाधान, गे! त्याचा उद्गम झाला. २८

त्वद्विषयींचा अशा प्रकारें शोक अंशतां शमला,
परंतु आई! तुझी कधींही विस्मृति पडली न मला. २९

[९]

बाळपणीं मम जेथें गेले दिवस सदैव मजेंत,
नानापरिचे खेळ खेळुनी मुलांमुलींसमवेत; ३०

जेथें गे! तूं असतां न मला शिवला आपद्गंध,
बालक्रीडारंगीं जननी! रमलों मी स्वच्छंद; ३१

जेथें खेळुनि आलेले मम घर्मबिंदु ते भाळीं
पुसुनी स्वकरें, प्रेमें त्वां मम चुंबिलि कपोलपाळी; ३२

अंगीं घालुनि नानारंगी शिवलेले त्वां डगले,
जेथें गेलों शाळेला मी, पाटी मारुनि बगले; ३३

जेथें मजला भला लाभला लाभ तुझ्या प्रेमाचा,
ज्याशीं तुळितां क्षुद्र भासतो शैलहि मज हेमाचा; ३४

त्याच स्थानीं आज न अपुलें नांवहि राहे मागें,
काळाची अशि घातक करणी जगतींत सदा जागे. ३५

माझ्या आयुःक्रमामधें ज्या घडामोडि गे ! झाल्या,
त्यांनीं असती पूर्वींच्या त्या गोष्टी सर्व बुझाल्या. ३६

प्रसंग नव्हते मम हृत्पटलीं पूर्ण जननि! जे ठसले,
कालकरानें तत्स्मृतिला अजि समग्र आहे पुसलें. ३७

[६]

जो त्वत्प्रेमप्रत्यय मातें माते ! परि आला गे !
त्याची स्मृति अतिनिश्चळ माझ्या स्वांतीं संतत वागे. ३८

लाडानें मज गोंजारूनी, मधुर गाउनी गीत,
तेथें होतिस काळजिनें तूं नित्य मला निजवीत. ३९

प्रभातकाळीं उठवुनि मजला, घालोनीया न्हाऊं,
शाळेला त्वां सदा धाडिलें प्रेमें देउनि खाऊ. ४०

प्रेमजलाचें सिंचन करुनी, मन्मानिं गुणवल्लीला
वाढविलें त्वां, अवर्णनीया होय खरी तल्लीला. ४१

शुद्धप्रेमप्रवाह तूझा कधीं भंगला नाहीं,
मंगलदायक होता निश्चित निखिल मंगलांनाही. ४२

भेसुर त्यांत न कधींहि उठल्या रागाच्या गे! लहरी,
दूषित झाला मधुस्वाद तो, कधीं न दुर्मतिजहरीं. ४३

ह्या गोष्टींचें स्पष्ट रेखिलें ठळक चांगलें चित्र
हृत्पटलीं मम असे, स्मरें मी सदा त्वदीय चरित्र. ४४

मृतिपर्यंत स्मृति मजला ही कधीं न गे! सोडील,
दैवत माझें तूंचि, असो हें असें सदा मम शील. ४५

[७]

भवसिंधू हा विशाल, भयकर, दुस्तर, कठिन स्पष्ट,
जीवितनौका दुर्बल, नाजुक, फार पावते कष्ट. ४६

विषयांचे हे फेनधवल वरि उठती तुंग तरंग,
दुःखांचें तें वारें सुटुनी होय मनुजधृतिभंग. ४७

कामक्रोधादिक हे मकर क्रूर खावया टपती,
ज्यांच्या वदनीं पडुनि मानवीप्रयत्न ते आटपती. ४८

परंतु धरुनी सत्यभक्तिबळ सहिष्णु! मंगलशीले!
जननी! त्वां हा सिंधू तरुनी, पैलतीर मिळवीलें. ४९

श्रुतिकटु वीचिध्वनी न तेथें, किंवा तें वादळ न,

आपद्वात्या वा त्या करिति न तेथें धृतिचें दळन. ५०
अखंडसुखमय, मंगल, परमानंदकंद, तें स्थान,
तल्लाभाची बळहीनाला या मजला आशा न. ५१

[८]

प्रबळ प्रळयानिळसम वाहे दुःखपवन हा क्रूर,
भीषण भैरव रव करुनी हा फेंकी मजला दूर. ५२
विचारशक्ती जाई भंगुनि, पडतेच दिशाभूल,
धैर्यशीड जें विशाळ, सुंदर, झालें तन्निर्मूल. ५३
प्रतिकूल प्रतिदिन प्रवाहीं प्रबळीं पडुनी वाहें,
नीर बुडवितें, तीर न दिसतें, धीर कसा मग राहे ? ५४
येवोत परी किती संकटें, झालों जरि दुरवस्थ,
सुखस्थिती तव तरी करितसे माझें चित्त स्वस्थ. ५५
'मंगलधामपदीं वससी तूं' हा मज नित्य विचार,
समाधान अति वितरुनि, करितो मोदित अपरंपार. ५६
प्रिया कल्पना असुनी प्रबला, जवळी जों ही प्रतिमा,
तोंवरि माते! जुमानीं न मी कांहींहि यमा अधमा. ५७
तुला यमानें नेलें, परि तें यश न लाभलें त्यातें,
बोध करोनी अजुनी सुखवी तव मूर्ती मज मातें! ५८

[९]

तव मूर्ती ही परमेशाचें सौम्य रूप मज गमतें,
ह्या भक्ताचें तन्मय होऊनि चित्त त्यांत अति रमतें. ५९

जें जें लोकीं मनोरम्य, तें एकवटे प्रतिमेंत,
विसरुनि मी भवजाच क्षणभर, मोदांकुर मनिं येत. ६०

कल्पलतेसम अनल्प सुखफल ही मूर्ती तव फलते,
व्यसनगिरीशीं झुंजायाला देई मजसी बल तें. ६१

प्रतिमा तेजोमय माते! ही असतां मला समीप,
वाटे सत्पथ दावायाला आला दैविक दीप ! ६२

सुधाकिरण ते तनुवरि पडतां, नव जीवन जणुं मज ये ,
बुद्धि फांकुनी, स्फुरण चढे, गति वाढे दुर्मतिविलयें. ६३

अमृततुल्य तव दृष्टि सेवुनी दुःख तरेन सहेल;
जननी! तव या उपकाराची फेड कशी करवेल ? ६४

निर्हेतुक, निष्काम, उपकृती माता संतत करिते,
कसें फिटावें तिचें ऋण? असें अपार अगणित तरि तें. ६५

स्मारक तव गे! म्हणुनी रचिल्या मी ओळी या चार.
बहुमोलाचें काय करूं? मी फार असें लाचार! ६६

'हीनमोल हें भिकार' म्हणुनी, करोत जन धिक्कार,
ईशगृहीं परि सत्प्रेमाला येइल मोल अपार ! ६७

विनयानें तव चरणीं अर्पुनि आज अल्प हें फूल,
धन्य धन्य हें स्वतास मानी, प्रेमबद्ध तव मूल. ६८

८. विचारभ्रमण.

(पृथ्वीच्छंद)

निशासमय माजला, भुवन शांत रूपा धरी,
असे पवन झोंपला गिरिवरी दरीं कंदरीं.
सुषुप्तिवश वारिधी हळुहळूचि घोरे जणूं;
'तरू शिथिलपर्ण हा निजतसे' न मी कां ह्मणूं? १

प्रशांत समयीं अशा शयनकाम शय्येवर
मुहूर्तभर मी पडें मिटुनि लोचनें सादर,
सुषुप्ति मग ये करूं अमृतसेक जों पेलव,
अकाळ टिटवी करी हळुच एक तों टिव् टिव. २

क्षणांत मज सोडुनी सुखद दूर निद्रा पळे,
पुन्हां न अवमानिता कुपित माननीशी वळे.
पुढें तळमळी उठे, बहुत ताठले लोचन,

स्फुरे स्मरण, वावरे भ्रमणशील माझें मन. ३
भराभरचि तें क्रमी सकल पूर्व आयु:पंथ,
प्रसंग सुखदु:खद प्रकटले पुन्हां सांप्रत.
क्षणांत चितरी स्मृति प्रथम रम्यसें शैशव,
वसंत मनुजायुचा करितसे प्रमोदोद्भव. ४

न विस्मय करी असें जगतिं तेधवां अल्प न,
न बुद्धिपरिपक्कता, परि भरारतें कल्पन.
प्रसन्न मळहीन तें हृदय निर्झराचें जळ,
न काममुख षड्रिपू विकट घालिती गोंधळ. ५

नसे दडपणीं मनीं विकट काळजीची वरी,
प्रभाव निज दाविण्या मदत काळ जीची वरी.
डुले मन सुखामधें, सुमन मंद वायूंत कीं!
स्रवे सुभग सौरभ, द्रवतसे मरंदोदकीं! ६

अकारण परोपरी सहज अज्ञ चाळे करूं;
परि स्वजन वानिती, 'किति हुशार हें लेंकरूं!'
स्खलद्वचन जें वदूं अमृतभान ये त्याप्रत,
अहा! यश असें नसे सहजलभ्य हो! सांप्रत. ७

जडे परि कधीं कधीं भलतसाच हेका मना,
कळे नच अह्मांस कीं निज अशक्य हे कामना.
करूं रडरडूनिया मग गृहामधीं गोंधळ,

क्षणैक हृदयास या भिनुनिया निराशाकळ. ८

क्षणेंचि परि सर्व तें विसरुनी, पुन्हां आपलें
विनोदपर शांतसें हृदय होय संतापलें.
न अक्षय विदारिती हृदय कामनाभंग ते,
खरी रुचिर विस्मृती! शिशुमती सुखीं रंगते. ९

प्रफुल्ललतिकातृणादिक करीति ज्या गुंफणी,
सुगंधरस सेवुनी लघु झरा भ्रमे तद्वर्णी.
मधून जरि आडवे उपल त्यास येती, तरी
क्षणैक बिथरे, पुढें परि रसेल गीतस्वरीं. १०

शिशूपण असें, डसे न चिर आपदा घातुक.
मुदें उसळतें वरी हृदय तें, जसा कंदुक.
अहा! अनुभवास ये मज न आज उल्हास तो,
क्षतें गहन काळजी करि; मनोरुजें त्रासतों. ११

न मी खुष जरी, तरी मज बळेंचि घे जो कडे,
रुचे न मज चुंबिणें, तरि लवेचि तोंडाकडे;
चिडूनि धरुनी करीं कच तदीय तेव्हां बरे,
बळें हिसडुनी, करीं बहुत त्यास मी घाबरें. १२

कधीं रदन कोंवळे विचकुनी कुणा वेडवी,
कधीं कमर वांकवी, जरठवृत्तिला दाखवी,
तरी सकल हर्षती, धरि कुणी न रागा तिल,

करीत गुण दोषही दिन अतां न ते येतिल. १३

सदा जननि वागवी कुसुमगुच्छसा आवडीं,
करी जतन, साहुनी विविध कष्ट ती बापडी;
सदा परि गणी सुखें अमित त्यांतची माउली!
तिचें स्मरण कां न हो मजसि पाउलीं पाउलीं? १४

प्रशीतल सदा जशी विमल पार्वणी कौमुदी,
करी सुखद वास ती कुमुदिनी जशी सन्मुदीं!
जगत्प्रमुदया जणों शुचि मनुष्य देहावरी,
अशी जननि पाहण्या मति न कां असो हावरी? १५

अनंत जग, ही तदा मजसि कल्पनाही नसे,
गमे स्वसदनापुढें वितत विश्वही हीनसें.
अभंगममतासरिज्जननि भासली ब्रह्मच,
चराचरहि मानिती जणुं तिचेंच सारे वच! १६

गदार्त विव्हळें यदा विकळ मी स्वशय्येवरी,
क्रमी रजनि ती, जसा दिन, अलोचनीं जागरीं.
अहेतुक अलौकिक प्रकृतिदिव्य सत्प्रेम तें,
असें जननिचें खरें परम पूज्य विद्वन्मतें. १७

सुरंग झबलें, शिरीं भडक लाल टोपी नवी,
कडेवर बसूनिया जननिच्या अशा वैभवीं,
लसत्स्मितमुखाब्ज मी दिनकरास्तमानावधीं

निघे शुभ सुरालया न विसरेन त्यातें कधीं. १८

त्रिथें भरित तंडुलीं धरुनि नित्य वाटी करीं,
पुराणिकबुवापुढें रुचिर दुर्गघाटी करीं;
तयांत शिवराइ तों वसवुनी मुदें फारची,
सुपूगफलरूप मी कलश रम्य जाणों रची. १९

गमे शिशुपणांतलें मधुर आज भोळेपण,
मनाप्रति न टोंचले असह संशयाचे गण.
न काउचिउची कथा अनृत वाटली सर्वथा,
सलील मन आदरी सततही विनोदी पथा. २०

महापवनसोदर प्रजव भव्य वारूवरी
प्रवीर रणधीर जो चतुरधी सवारी करी,
करूं चढ तयावरी चपल कल्पनेच्या जवें,
गृहींच हय याष्टिचा पळवितां प्रभूतोत्सवें. २१

मनुष्यबलहीनता न हृदयास आयासवी
अहो ! रुचिर अज्ञता, बहुत जी प्रमोदास वी!
भवामधिल वेधवां न रुतले कधीं कांचरे,
भ्रमूं सुखरसीं जसे भ्रमर सारसीं चांचरे. २२

६. हीच संधी.

(वसंततिलकावृत्त.)

आहे वसंत जंव, तों कुसुमांस वेंच,
हा काळ अप्रतिम धावतसे जवेंच;
हें पुष्प आज फुललें मधुगंध घ्याया,
म्लासील निष्प्रभपणा पण गा! उद्यां या. १

गांठलि या क्षय जरी कुसुमाकराला,
येतील का सुमफलें तुझिया कराला ?
जों तप्त लोह तळपेल जणूं निखारा,
ज्ञाता तयावर करील घनप्रहारा. २

विश्वप्रदीप रवि हा मिरवि प्रताप,
लाभे समुन्नतिपथास यथाक्रमानें;
ती उन्नतिप्रति गतीच परी अपाप
अस्ताचला निकट त्या द्युतिविभ्रमानें. ३

तारुण्य सत्समय निष्फळ या न वेंच,
घे! हाण घाव! जंव रक्त असें नवेंच;
मृत्युध्वजा फडकतां, खचतां उमेद,

नि:शक्त होउनि बसाल करीत खेद! ४

व्यर्थ क्षणा न दवडीं, त्यजिं सर्व भीड,
या जीवनार्थकलहीं शुचिभाव भीड;
खाऊं नको कचर, हो दृढ लोहकांब,
हूं! झाड आळस, नको ह्मणुं 'मृत्यु लांब.' ५

७. मुलगा आणि पोपट.

(भुजंगप्रयातवृत्त).

मु०—"वसें सुंदरा! वा! शुका! याच ठाया;
तुला मी फळें गोड देईन खाया.
असे स्वच्छ, पाहा, भला पिंजरा हा,
तशीं काचपात्रें; सुखें येथ राहा. १

तुला नित्य गोंजारणारा असें मी,
न कांहीं उणें होइल प्रेमनेमीं.
प्रभातीं ह्मणें नित्य तूं रामनाम,
फळांचें तुला लाभणारें इनाम." २

पो०—"मुला! प्रेमला! जो मला बोललासी,

भला गोडही तो मला बोल लासी.
तुझे फार अभार मानूनि सांगें,
' कधींही न वा ! कर्दमीं सुज्ञ रांगे. ' ३

मृदूही तुझे बोल ते पोपटा या
मुला! लागती वज्रसे धोपटाया.
न गोंजारणें तें रुचे त्वत्करांनीं,
रुचे राहणें शाहण्या ! रम्य रानीं, ४

नदीतीरचें नीर ताहान वारी,
तसें काचपात्रांतलें तें न वारी.
तरुक्रोड बाळा ! मला रानवाटे
तुझ्या पिंजऱ्याहूनही छान वाटे." ५

मु०—"वनीं कोठ जाशील ? चित्तीं विचारीं,
दिशांना जधीं झांकतें वारि चारी.
जळानें भिजूनी तरुक्रोड जाई,
शुका ! तूं रहा मत्सवें याच ठाई." ६

पो०—"मुला ! रे ! मुळींही जलासी न भीतों,
उडें मी त्वरें शाद्वलीं वा नभीं तों.
वसंतीं पसंतीं पुन्हा चैत्रमासीं
मुला ! ऐकसी रम्य मद्गायनासी." ७

मु०—"अरे ! डोंगरीं कंदरीं कोण दावी

तुला वाट ? ही गोष्ट मातें वदावी.
शुका ! बा ! फुका देह दुःखीं न पाड,
स्थळीं या रहा, चालवूं सर्व लाड." ८

पो०—"गिरीं, कंदरीं, सागरीं वा अफाट,
मला दावितो देव तो योग्य वाट.
नभीं या विहारार्थ मोठ्या मजेंत
स्वतंत्रत्व मातें प्रभू पूर्ण देत. ९

स्वतंत्रत्व आहे खरें सौख्यतत्त्व,
तयावीण सारें असे नष्टसत्त्व.
जडे शृंखला जेधवां ती पदास,
घडे मत्त हत्तीहि तो दासदास. १०

करी शर्करेला कडू तो ज्वरांश,
जसा कीं सुधेला विटाळी गरांश;
तसें सौख्य सारें पडावें फिकेंच,
बसे जों पदीं, आणिला दास्य, पेंच." ११

८. मुलीची पाठवणी.

[मुलगी सासरीं जाण्यास निघाली असतांना, तिला तिच्या जनकानें केलेला कळकळीचा सदुपदेश पुढील आर्यांत ग्रथित केला आहे.]

(गीतिवृत्त)

जन्मापासुनि तुजला प्राणासम समजलों, न गे! ऊन,
तुजसह सुखनिधि अजि परि अन्यकरीं अर्पितोंचि नेऊन. १

जे परकी, ते झालें बाले! तव आजपासुनी आप्त,
पर, कीं परकीयत्वचि आम्हांला आज जाहलें प्राप्त! २

होतों सुखांत बाळे! सुखांत पाहोनि सर्वकाळ जिला,
काशि नांदशील ती तूं पतिगृहिं, आशि वाहुं सर्व काळजिला. ३

होइल उदास सारें, आह्मां भासेल शून्य हें सदन,
कोमेल हृत्कुमुद मम, होवोनि तुझें अदृश्य शशि-वदन. ४

ये कंठ भरोनि, फुटे शब्द न, नयनांत लोटतें वारी,
मशुल्य स्थिति तवही होय, परी दुःखलोट ते वारीं. ५

नाई बाळे! डोळे पूस, मना आवरीं, नकोचि रडों,
आह्मां वृद्धांचीं गे! दुःखें हृदयें बये! नको चिरडों. ६

जी जी विवाहिता स्त्री, तिस पतिसदनीं अवश्य गे ! जाणें,
सोडीं मोहा, जोडीं निश्चय, जनरीति ही असे, जाणें. ७

जें गृहशिक्षण आह्मीं दिधलें, त्याची बरी करीं चीज;
कर्तव्यीं, सत्कर्मीं, परोपकारीं बये ! सदा झीज. ८

सन्मार्गें चालावें, दिशा धरीं नित्य साधु-रीतीची,
सेवावें तिस जों जों, तों तों वाढे सुमाधुरी तीची. ९

'पतिसेवा आद्य स्त्री–कर्तव्य' स्मर असें मनामाजी,
संतुष्ट ठेवुनी त्या होइं सुखी, हीच कामना माझी. १०

पति दैवत आद्य असे, तोचि असे स्त्रीस आत्म-जन्महित,
तव चित्तचकोर तया चंद्राला भजुनि होउं सन्मोहित. ११

क्रोध सदा आवर तूं, मग तव गातील लोक गुणगीतें,
कलहास कोप चेतवि, वायु जसा क्षिप्र अल्प फुणगीतें. १२

पति कोपती, तरी तूं त्यजीं न विनया, न शांतिला ढळवीं,
होतांच शांत तन्मन, सस्मितमधुरोदितें तया वळवीं. १३

सुविनीत, सुशीलवती, सुखमूर्ति, अशा सतीस पति वर्णी;
स्वपतिकृतस्तुति सुख दे तीस सुधावृष्टिसी सदा कर्णी. १४

वाचीं पतिव्रतांचीं पुण्यचरित्रें बये ! मनोभावें,
तत्कृति-गुण-कीर्तीतें चित्त तुझें सर्वदैव लोभावें. १५

ऐकें मुली कुलीने ! वर्णी स्वसतीस धन्य तो धर्म,

धन्य द्रुपदसुता ती, यत्कृति सकलांस देतसे शर्म. १६

" धर्म ह्मणे ' शकुने ! जी रूपें श्रीला, क्षमागुणें महिला,
साजे, सखी अखिन्ना कृत्यभरें सुमति आमुची माहिला. १७

शरदुत्पलपत्राक्षी शरदुत्पलपुण्यगंध समगंधा,
अस्खलित चालवी गृहधर्मी मज, यष्टि पथिं जशी अंधा. १८

आधीं जिणें उठावें, पाहुनि निजलों असें मग निजावें,
रागेजणें सुदुर्मिळ, तेंहि जिचें ज्वाळसें गगनिं जावें. १९

धौम्यापासुनि गोपापर्यंत जिणें स्वयें समाचार
घ्यावा, श्रिततापहर श्रीगंगेचा तिचा समाचार.' " २०

हे शब्दमणी वागविं हृदयीं प्रेमें, तसे न रत्नमणी,
गुणगण चिंतामणिसम व्हावें, त्याचे बये ! सदैव धणी. २१

प्रात:काळीं उठुनी शुचि व्हावें, शांत चित्त ठेवावें,
भावें कर जोडावे, ईशातें भक्तिपूर्व सेवावें. २२

स्मरुनी ईश मनीं, जो थोर जगद्भार नित्य सांवरतो,
लागावें मुदितमनें करण्याला गे ! घरांत वावर तो. २३

संतृप्त मुदित चित्तें गृहकर्मी जें विशंक राबेल,
तेंच कलत्र पतीला मान्यप्रिय जेंवि शंकरा बेल. २४

करुनि सडासंमार्जन, जपुनी घालीं सुरेख रांगोळी,
निर्मळ गृह बघुनि, मुखीं घालूं जन कौतुकेंचि आंगोळी ! २५

वेणीफणी करावी नीट, नसावें चटोरपण तींत,
सहज सुरूपीं तुळितां, कृत्रिमता शून्य होय गणतींत. २६

कृत्रिम पुष्पें दिसती सुंदर, परि देति काय परिमळ तीं ?
अंतर्गुण तो नसतां, बाळे गे ! रम्य काय परि मळती. २७

परकी न त्यांस मानीं, असती जे स्वजन, दीर, जावा, गे !
मत्सर करीं न, न विटो त्यांना मन, तव न धीर जावा गे! २८

कोणास न निंदावें, कोणाचे रिपु कधीं न वा होणें,
सुज्ञें परकीयांच्या कलागती लावणें न गे ! कोणें. २९

सद्वर्तनास ठेवीं, होई तूं न प्रवृत्त वादास,
विनयेंच मान मिळतो, गोडेंपण देइ साधु-वादास. ३०

कुजनासहि सज्जन तव सच्छील करील जाण, गे सोने !
परिसाशीं झगडे जें, आपण तें लोह होतसे सोनें. ३१

कंटक पदांत शिरला जोरानें काढिल्यास कळ लागे,
जरि शमविशील सुवचें दुष्ट, तरी मदुपदेश कळला गे ! ३२

शांति क्षांति प्रकटीं, त्याच सुवृत्तींत मोहनी जादू,
विषतरु वितरु कडु फळ, अमृततरु परी फळे फळें स्वादू. ३३

तरवार वार न करी, हृदयांत जसें करील कटुक वच;
वचक तुझा राहिल, गे ! वरिशील मनीं जरी क्षमा-कवच. ३४
गोसावी संन्यासी भोंदू येती स्त्रियांस ठकवाया,

तद्बहिरंगा भुलुनी, भ्रमूं, भ्रमूं, तूं नको कधीं वायां. ३५

विश्वास दाखवोनी, पाडिति भोळ्यांस पिहितमुख खळगे,
तैसे स्त्रियांस, वरुनी करुनी अति दंभ, अमृतमुख खळ गे! ३६

'परम शिव जीत नांदे,' जी दुःखें सर्व अठरा खणती,
तुज मंगल जनकाशी काशिसम होय पाठराखण ती. ३७

जा बाळे! पतिसदनीं, देतों तुज सर्व मंगलाशीला,
जाई सन्मार्गानें, मलिन करूं नको स्व मंगला शीला. ३८

---

९. मुलीस जनकाचा उपदेश.

[ह्या मैनलदेवीनामक काव्यांतील द्वितीयोद्गार आहे. यांत कर्णराजपत्नी मैनलदेवी ही राजकन्या सासरीं जाण्यास निघाली असतां, तिचा पिता राजा जयकेशी यानें तिला केलेला उपदेश आहे.]

(आर्यागीति.)

जनकांसी तनुजांची सुस्थितिचिंता निरंतर अतनु जाची;
मिळतां समशील पती, पितरांच्या काळज्याहि निमिषीं लपती. १

झाली निज तनुजा या वीरमणीची विलोकुनि सुतनु जाया,
मानवला जयकेशी प्रेमलभावें स्मरे प्रभु हृषीकेशी. २

परधनचि कन्यका ही, घोर नसे थोर अन्य त्यासम कांहीं,
जयकेशी सुखधामीं शिरला, पाहोनि योग्य नर तत्स्वामी. ३

निरखुनिया दुहिता ते सुपतिकरीं, तो करी तिच्या सुहितातें,
दे परि अकातराही कंप सुताविरह; शांत मन का राही ? ४

प्रेमनिधी जनकाचें, अपत्यविरह स्मरूनि, त्या मन काचे;
शोक करी उर लाही, वीरजनोचित न धैर्यलव उरलाही. ५

त्यजितां आत्मजनांना उठती विकृती अती निसर्गज नाना,
नृपदुहितामन उललें, गाल गुलाबासमान शोकें फुलले. ६

नीहारोदक-लवसें अब्जीं, नृपजेक्षणांत अश्रुजल वसे.
पूर्ण-स्थैर्य-समुदाया अश्रुविना पथ न शोक–कालीं हृदया. ७

शोकांत मन उमळलें, कज्जलवारींत गाल ते मउ मळले.
नयन-ज-जल उडुनि करी परिवृत तद्वदन-चंद्रमा उडु-निकरीं. ८

पोटीं स्वकन्यकेशीं कवळुनिया, कळवळे तदा जयकेशी.
परि कठिण करुनि निज मन, करिता झला पुढें सुता-शांतवन. ९

पुसुनी नृप अश्रु तिचे, धैर्यें वच बोलला, अमृत जें श्रुतिचें,
"शोकास न वश्य असें व्हावें, हा तात-विरह अवश्य असे. १०

आप्तचि झाले पर कीं, जन-रीत्या जनक-जननि बाले! परकी.

परि उकलिं मोहग्रंथा, कर्तव्य करीं स्मरून नव संबंधा. ११
उज्ज्वळ राज्ञी-पद तें केवळ भोगार्थ हें नव्हे; हित वदतों.
सामान्य स्त्रींपेक्षां राज्ञीची परहितार्थ अधिक अपेक्षा. १२

पत्नी-कर्तव्यातें करुनी सार्थी मुलीं! परम भव्यातें,
स्वकुटुंबासी वसुमती राज्ञी-दृष्ट्या गणून, होई सुमती. १३

सेवावें नित वडिलां, त्या अवमानुनि गणीं निजार्थ दवडिला.
धरितांचि वांकडा गे! पथ, कुल, शीलहि मळेल बाळे! डागें. १४

आचर पति-हित-करणी, चातुर्यें तूं करींच तन्मनधरणी.
क्रोधा जरि तो पतिला आला, त्याचा तरी न यो कोप तिला. १५

पतिची चिर सेवा गे! करीं, प्रकारें सदा रुचिरसें वागें.
पाळील सती-व्रत, ती स्त्री न. मिळाली पतीस कल्प-व्रतती. १६

समयोचित वर्ताया शिकें, सदा टाळण्या व्यसन-गर्ता या.
वचन सदा वद गोडें; त्यानें मित्रत्व, सयश जना जोडे. १७

बोले वचनाला गे! जेंची सुधालव-रुचिर-रुचि जना लागे.
सुस्वर गातां पिक, तो श्रोतृ-गणीं परम मोद बाळे! पिकतो. १८

कटुका वार्ता सकळां दुःखद होई, जणूं गदार्तास कळा.
धरुनी कोपा जळती जन कुवचें, जणुं घृतें दहन पाजळती. १९

सौम्यपणें नित वागें, तेंचि पराभविल सर्वही कितवा गे !
वर्तोनि सुशीलपणें, प्राप्त करावें खलाहिलाही लपणें. २०

बहु नित्य दास-दासी 'हांजी' करितिल तुझ्या नमूनि पदासी,
चतुरत्वा दावुनिया वागें, जाई मुली ! न नादावुनिया. २१

मंत्री वृद्ध इमानी जे, त्यांना गुरुसमान बाई ! मानीं.
राज्य प्रासादाचे स्तंभ भरसह प्रचंड तेचि सदाचे. २२

सज्जन जवळ धरावे; स्वकीय दोषास गे ! सदा सुधरावें.
नित्य पहावें खोल, स्तुतिला होऊं नकोचि बाळे ! लोल. २३

दूरवि, करति चळवळी जे, त्यां; वा कार्यमग्न ठेवीं जवळीं.
" होई अग्नि स्वैर क्षयकारक, " तत्व हें नसे गे ! गैर. २४

करितो जो घोटाळा, देइ विचारास आळसें जो टाळा.
तो जाणावा चवळा, ऐसा नर निजहितास नित आंचवला. २५

भलत्यास न सांगावें कार्य; पिकातुल्य वायसा कां गावें ?
कार्यक्षमता त्याची पारखुनी, योजना करी कर्त्याची. २६

सहसा न धरिं भरवसे, प्रामाणिकसा शतांत एक नर वसे.
पूर्ण विचार करावा, तकवादम मानसीं पुराचि धरावा. २७

वीरस्त्री, वीरसुता, असली; बरवी अकीर्तिहून व्यसुता.
हें ध्यानीं नित्य धरीं, भीरुत्व न तूं कधींहि घेई पदरीं. २८

कुलशील कुलीनांहीं सोडावें उचित कधींहि मुली ! नाहीं.
येतां प्रसंग बांका, जाऊं द्यावा तुवां न तो आंवाका. २९

विश्वासिं (व) भवितव्यीं, प्रसंग येतां चुकें न निज कर्तव्यीं.
न?

दु:खाचा न धरिं कदर, चाळ परिस्थितिस जेविं करतल-बदर. ३०

राहशिल सावधान, क्षणहि तुला मग करील भवबाधा न.
असतां गत-भान हरी, शृगाल गोंधळ करी न का गिरिकुहरीं? ३१

नित्य स्मर हा बोध, क्षणमात्रहि या करूं नको प्रतिरोध.
याच अलंकारीं ती ये शोभा; दावि निष्कलंका रीती. ३२

जी मंगल शिवकेतू, स्वापत्यवनिं धरी सदय जी हेतू,
ह्मणुनि जिला जन 'काशी' ह्मणती, ती अर्पितों तुला जनकाशी.

कृत्यीं नित्य पवित्रीं रमुनी, हो स्तुतसती जशी सावित्री.
सत्कीर्ति-स्रग्धवला पाहुनि तुज मुदित जन करो अति नवला."

श्लोक.

परिसुनि जनकाची सौख्यखाणी सुवाणी,
स्थिर हृदय करोनि, झाडुनी नेत्र–पाणी,
सविनय नृपकन्या बोलली ती पित्याशीं
" मज हित–जनकाशी लाभली अर्थ–राशी. ३५

प्रथम नववियोगें मन्मन:कंप झाला,
परि तव वचनानें क्षोभ सारा विझाला.
त्वरित सकल भंगे भ्रांतिचा रंग–राग.
निववि हृदय–दाहा सूक्तिचा अंगराग. ३६

रुचिर सदुपदेशा मानुनी रत्न–हार,
निज हृदयिं सदा त्या आदरें ठेवणार.
त्यजुनि सुहितबोधा, मानितां श्रेष्ठ वित्त,
सुख न वितरतें तें, भ्रांतवी मात्र चित्त. ३७

समजुनि निजधर्मा, आचरोनी सुकर्मा
मिळविन नित ताता ! त्वत्प्रसादेंच शर्मा.
कवळुनि, जशि हंसी, सद्गुणांभोज–सार,
करिन विगत–पंकीं मानसीं मी विहार. ३८

वितत जनपदाची जाहलें श्रेष्ठ राज्ञी,
जरि परिजन साचा वागला तो मदाज्ञीं;
तरि परम दयाळू प्रेमळा तात–मूर्ति
मज वर–पद–दाती नित्य राहील चित्तीं." ३९

अनुष्टुप्.

निरोप स्वजनांचा तो प्रेमें घेवूनि तेधवां,
खेद–मोदाकुला गेली मैनला सह ते धवा. ४०

१०. गृहिणीधर्म.

[एका वृद्ध सासूचा आपल्या तरुण सुनेस गृहिणीधर्मासंबंधीं उपदेश.]

(गीतिच्छंद.)

मम सदुपदेश परिसें, परिसेवावें जया कुलीनांहीं,
इहपरलोकसुखार्जनसाधन याविण दुजें मुली ! नाहीं. १

आह्मी वृद्ध, न अमुची शाश्वति, संसार हा तुझा होय;
तरि हो धन्य, वितरुनी सुख जैसी, घनघटा मधुर तोय. २

संसार-शकट अवजड पुरुष-स्त्री दोन हीं तया चाकें,
जरि तीं समतोल न गे ! तरि बाई ! शकट हा कसा हांके? ३

' गृहिणी सुशील गृहची, ' हें वच वदती सुख-प्रभव संत,
सत्संग सदन करितो, जेविं करी वन सुख-प्रभ वसंत. ४

जी पत्नी सद्वर्तन, सन्मति, तद्गुण कधींहि न लिकेची,
रमवी नित्य पतीला तल्लीला, जशि अलीस कलिकेची. ५

प्रागज्योती हो ! ती, तीविण मृत-देह-साम्य ये गेहा,

सुकलत्रावीण न जन लाभे सुखयुक्तितें बये! गे! हा. ६

अतिपुण्यचरित्र सती स्वयें तरे, तारिते स्वपतितें ही,
लभोनी तद्दर्शन व्हावें गे! मुक्त इतर पतितेंही. ७

परि जी कुचरित्रा स्त्री आत्मा करिते कुलासकट साधी,
ती पतनासचि कुलटा, उलटा पथ सेवुनी, प्रकट साधी. ८

पतिसेवापर होई, तत्सौख्यातें सदैव हो जपती,
स्त्रीचें सुख, सौभाग्य, प्रियमंगल आणि होय ओज पती. ९

पतिस यथाशक्ति सदा सेवीं, देईं सुखा महा यास,
त्रासें भ्रूभंगानें न दे मुली! त्यास तूं महायास. १०

एकमतें वागावें, भांडण न करीं परस्पराशीं तें,
कलह सुखातें नाशी, दहन जसा मृदुल पुष्पराशीतें. ११

आणी पतिव्रतेवर हट्ट सदा कठिण संकटाला गे!
सीता हेममृगाग्रह धरितां पाठीस कटकटा लागे. १२

मुख्यालंकार पति, व्यर्थ तयाविण दुजे अलंकार,
निर्धनता बरवी, परि न धनाचा बाइ गे! अहंकार. १३

आळस गृह बुडवीतो, प्रत्यक्षाचि तें करंटपण साचें,
श्रमलभ अमलयशःफल, रसमय परि, सुफल जेवि पणसाचें. १४

वाणीपरी स्वकरणी नसेल, तरि तें विवेकहीनत्व,

तेणें हंसती सगळे, होई जीवित समग्र निःसत्व. १५

निज तोल पाहुनीयां दाखविं तूं हावभाव जगतांत,
अति उंच फलार्थहि जो उद्वाहु बटू, तयांस हंसतात. १६

आदा पाहुनि करणें खर्च, तसें धर्मदान, सुनबाई !
ऋण होय नरक मोठा, त्यांत न, जाणोनि, जाणता जाई. १७

चाणाक्षपणा दावीं, व्यवहारीं सर्वदैव दक्ष रतें,
राखी हिशोब सारा, हानिकरी मानिं गे ! निरक्षरते. १८

सेवकजनिं लक्ष्य असो, मृदु बोल कधीं, कधीं जरा रागें,
जो नित्य ढिला वागे, राहिल त्याचा कसा दरारा गे ! १९

सन्निश्चय तव न ढळो, ढळतो सतिचा जसा न तो पदर,
स्वमनीं दचकुनि पावे, मानुनि अहितुल्य सत्यलोप, दर. २०

' करिती सकुटुंब महादुष्काळीं दीन जन उपासा जे,
तैशांवरि सत्कृपांहीं जी केली, तीच बहु कृपा साजे. २१

दीन व्यसनीं बुडतां, ताराया साधु हात नावरिती,
नाव रिती, सत्स्त्रीकृत पापिजनाला न यातना वरिती. २२

येतील समर्थाच्या कार्यास समर्थ, काय तें चित्र ?
तो धन्य स्तननोचित, जो दीन-जळास दुग्धसान्मित्र. ' २३

बाई ! सुबोधवचनें मनीं धरीं तूं महाकवीचीं हीं,
ह्यांनीं मनास शांती लाभे, तैशी न अमृतवीचींहीं. २४

प्रभुवर ठेवीं श्रद्धा, तीविण होणार जाण जन कष्टी,
ती आह्मां मनुजां गे! जैशी गतिहेतु आंधळ्या कष्टी. २५

पत्नीकर्तव्य, तसें मातेचें कठिण होय कर्तव्य,
परि तीं निश्चित मनसें करुनी सार्थी जगीं परम भव्य. २६

बाळांचें मन असतें, वसन अमल धवल तें जसें धुवट,
तरि डाग लावुनी त्या पापमळाचा, न घालवीं फुकट. २७

बाळांचें मन कोमळ वळतें सहजीं जसें नवें रोप,
कोप न करीं उगाची, प्रेमानें त्यांस शिक्षणा ओप. २८

सुनबाइ ! मुलें वंशाधारस्तंभाचि सुरेख गे ! पुढिले,
दे नीति बळकटी त्यां, नये तयांना कधींहि सोडुं ढिलें. २९

सदुदाहरणा दावीं, सद्वृत्त करीं सदैव पुत्रास,
‘ नेंवि बहु कुपुत्राचें, न फणीचें तेंवि दे वपु त्रास. ’ ३०

गृह शून्य अपुत्राचें, न कुपुत्राचेंहि शून्य का लोकीं ?
कुसुत कुलव्याधि असे, आत्मजना बुडवितो त्रपा-शोकीं. ३१

तरि हें ध्यानीं धरुनी, लेकी तूं प्रकट सच्चरित्र करीं,
लाभो तुझ्या करी गृह, जसें मुली! ग्रह सुकांति मित्रकरीं. ३२

येई सतीव्रताला बळ, न तसें लाभतें महाक्रतुला,
त्वत्संगें मम पुत्रा, तत्संगें होउं सौख्यलाभ तुला. ३३

११. सासूची जबानी.

महासद्गुणी, रूपखाणी, विनीता,
अशी सून होती सती जेविं सीता.
छळीलें परी तीस मी कैकईनें,
तिचे हाल केले अहा ! कैक ईनें. १

धरूनी मनीं बाइ! दुर्वासनेला
छळीलेंच मी सद्गुणी त्या सुनेला;
सुखें तीस खाऊं न मी देइं घास,
कुठें, बाइ! फेडीन मी ह्या अघास. २

किती ताडिलें मी तिला कोंवळीतें,
जसे गाइला निर्दयी गोवळी ते.
तिला मारिली, पोळिली, गांजली, हो!
अहा ! लाविली मी कुळा काजळी हो ! ३

अम्ही पाळितों नीट गोवत्सलातें,
तरी कां हणीतों सुनांनाच लाथें?
गुरांहूनि कां नीच झाल्या मुलीही ?
नसे हो दया सासवांना मुळीं ही. ४

करोनी गुन्हा मी, तिला उरफाटें

छळीलें, स्मरोनीच तें ऊर फाटे.
प्रभो! प्रेमळा आठवू सासु नात्या,
सुखें सासुरीं नित्य नांदू सुना त्या. ५
करी वत्स पाहूनि ती गाय ' आह्मां, '
परी सून देखूनि ये राग आह्मां.
कशी ज्ञानवर्ती तरी ही विझाली ?
पशूहूनही कां दशा नीच झाली? ६
करी ती जरी माझिया चाकरीतें,
तरी मी दिले डाग तीच्या करीं ते.
तिच्या मी सुखाची करीं नित्य माती,
मला ईश कैसा करील क्षमा ती? ७
बिचाऱ्या मुली येति मातापित्यांना
त्यजोनी, तरी वागवा नीट त्यांना.
अह्मी सासवा त्यांस आईसमान.
करावी तरी कां अह्मीं मारहाण ? ८
अतां मी कथीं आपुलें सर्व वृत्त,
तरी बाइ! ऐकाच देवोनि चित्त.
किती गांजिलें मी सुवृत्ता सुनेतें,
जिचें नांव तें शुद्धिला सत्य नेतें. ९
माझी ही समजूत, सून जगतीं व्हावी सदा सासुस,

कीं व्हावें छळण्यास तीस अपुलें स्वाधीनचें माणुस.
त्रासाचे अपुले न शब्द परके घेतील सोसून ते,
तेव्हां व्हावि अवश्य शांतमनसें ऐकावया सून ते. १०

बाळ्याला अमुच्या तशांत असती सोळाच वर्षें पुरीं,
त्याचें लग्न करा ह्मणून धरला मीं हट्ट भारी घरीं.
झाली ती समजूत माझि करणें कीं, ' तो असे धाकटा,
एव्हां लग्न करून ओढुन कशा घेशीं बळें संकटा ? ' ११

बोलें मी, " असलें न ऐकुनि कधीं घेणार मी भाषण,
नाहीं सून तरी न लेशहि असे लोकीं मला भूषण.
लोकांचे मुलगे विवाहित पहा होती कसे लौकरीं,
तुह्मी थंड कसे असेच बसतां ? शोधा बरी नोवरी. १२

बाळ्याचा करणें विवाह अगदीं ह्याह्याच संवत्सरीं,
नाहीं ह्यास कबूल आपण तरी, मी ऊन्न न स्वीकरीं.
घेती व्यर्थ कुतर्क लोक ह्मणती, ' कां वाढला थोर हा ? '
ह्याची लाज धरा, घरीं उगिच हो! ऐसें न आतां रहा." १३

ऐशी नित्य करूनि जाचणि घरीं, मीं हेतुला साधलें,
बाळ्याचें मग लग्न त्यांच वरुषीं थाटें महा जाहलें.
आह्मां रूपवती, भली, कुलवती, ती सून हो ! लाभली.
मीं तीतें छलुनी, परी निजकरीं लक्ष्मी दुरी लोटिली. ४

आणिली प्रथम प्रसंगिं तिजला आह्मीं जधीं सासुरीं,
तेव्हां तीस न जाचली मम मुळीं दुःशब्दरूपी सुरी,
कीं आली तिस पाठराखण तदा सख्खी तिची मावशी,
तेव्हां तिजशीं वागलें सततही सप्रेम मी मायशी. १५

जेव्हां ती परि एकटी मग पुढें राहूं घरीं लागली,
तेव्हांपासुनि जाचण्यास मजला वेळा भली लाभली.
तीतें मी छळुनी कुशद्ब वदुनी सासूपणा दाविला,
बाई! ह्या कृतिनें कलंक सुकुला माझ्याच मी लाविला! १६

आतां बाइ! छलप्रकार कथितें कांहीं तुह्मां मीच ते,
ऐकोनी तरि नीट त्यांस, ठरवा केलें किती नीचतें.
आह्मीं होउनि सासवाहि वकवा ऐसा घरीं मांडितों,
नीतिप्रीतिनयादिकां विसरतों, लज्जेसही सांडितों. १७

माझ्या त्या रडव्या मुलास दिधलें मी तीजपाशीं जरा,
तेव्हां तें रडलें, तरी मग बळें घें मी करोनी त्वरा.
मी तीतें वदलेंच निर्घृणपणें 'आहाग! चांडाळणी!
घेशी कां चिमटें मुलास दिवटे, नाहीं दया डांकिणी! १८

सोनूल्या! कळ येउनी किति तरी होसी असा व्याकुळ!
पंत्या लावुनिया खरेंच करटे! त्वां शोभवीलें कुळ.
कृत्यें हीं विवशी करूनि रडशी नांवें कशा आइच्या ?
आली मारूं मुलांस लासच, पुढें हो! शर्थ झाली इच्या. १९

येथें रोंवत राहशी जर अशी, होतील कामें कशी ?
का धाडील गड्यास बापुस तुझा? जा, चालती हो कशी.
बाई! भंडविलेंस लाज तुजला नाहींच कांहीं मुळीं.
जैशी खाण, तशीच माति निघते, ऐशीच ह्यांची कुळी!' २०

रोळी एकदिनीं धरून धुवण्या मी जाइ तांदूळ ते,
मार्गी ठेंचलुनी, परी मिसळली रोळीमधें धूळ ते.
तेव्हां मी न खडे मुळीं निवडितां, तैसेच ते धूतले,
आणोनी तसलेच सत्वर घरीं ते आधणीं वैरिले. २१

जेवाया बसतां खडे बघुनियां बाळ्या विचारी मला,
'आई! कोण असे बरें निवडिते आतांशि या तांदुळा ?'
बोलें मी "मजला विचारुंहि नको, तूं आपुले बाइले,
बाळ्या! पूस अतांशि ती निवडिते तांदूळ हे चांगले. २२

दांताच्या करुनी कण्या सतत मी सांगीतलें रे! तिला,
'बाळ्याला असतेच खोड निवडीं तूं नीट गे! रेतिला.'
घेते तांदुळ ती पुढें, परि खडे काढीत नाहीं अशी,
नाचूं संतत पाठिशीं तरि कशी हीच्याच मागे मशी." २३

होतां जेवण, हात मात्र धुवुनी, बाळ्या तसा सोंवळा
जावोनी पडवींत फार बडवी पोरीस तो बावळा.
'नाहीं ऐकत आइचें' ह्मणुनिया देईच ठोंशांस तो
होई हर्ष मला जसा अधिक तो बाळ्या तिला शासतो. २४

पोळीची भिजवीत मी कणिक ती होतें, परी पातळ
झाली ती मम हांतुनी पडुनियां जास्ती जरासें जळ,
तेव्हां मी वदलें सुनेस 'मुलिगे! आणी डबा तो इथें,
घाली नीट कणीक तूं अणिक गे! थोडी परातींत ते.' २५

काढोनी मग ती फळीवरिल तो आणी डबा सत्वरीं,
ओतीतां परि पीठ मूठभरुनी, सांडे जरा भूवरी.
तेव्हां जाउनि मस्तकीं तिडिक ती मी चांगलें हाणिं तें
बाई! कोलित लागलेंच भरुनी, मी डागलें हा! तितें. २६

थोडासा अपराध मात्र असतां, तो डांकिणीनें परी
मी मोठा करुनी, सदैव छळिलें हो! तीस वैऱ्यापरी.
बाई! या परि नित्य सत्य दिधली मी जांचणी तीस ती,
कांहींही न परी कधींहि उलटे हो! बोलली ती सती. २७

मी बोलें तिजला, परंतु अपुलें ती काम सारें करी,
संतापा न करून शांतमनसें माझी करी चाकरी
तेव्हां येउनि राग, आग तनुची होईच माझी अती,
बोलें मी, मग अंतरीं भडकुनी,राही परी शांत ती. २८

'निःशब्दें करुनी कसाइ करणी मानेस ही कापिते
बोलाया मज लावुनी, अवदसा ही रक्त माझें पिते
बोलावें तरि तोंड मात्र दिसतें, हीची कृती ना दिसे
ही ऐशी दिवटी निवून करटी लावी मला हें पिसें.' २९

पातेल्यांत भरूनि कांहिं जिलब्या शिंक्यावरीं मी स्वयें
होत्या ठेवियल्या, परंतु मजला त्या खावया हौस ये.
काढोनी जिलब्या, खुशाल जिभली मी आपली चारिली,
शिंक्याखालतिं पाट ठेवुन, परी पोरीस त्या मारिली! ३०

माझा तो अपराध बाइ! असतां, मीं बालटें तीवरी
घालोनी, तिस ताडिलें, वदुनियां दुःशब्द हे सत्वरीं.—
'माझें ही अटवीच रक्त सटवी, ढंगा करोनी अशा;
हा कैदासिणि! चोरटे! शिरकला पाया भिकेचा कसा!' ३१

बाई! गालगुचेहि घेउनि, तिचे मी मोडिले कानहीं;
लावीली धरुं आंगठे, करुं दिली नाहीं वरी मानही.
घालोनीच कुभांड, भांडुनि तिला भंडाविलें सर्वदा,
सासू मी असुनी, गतासु पिळुनी केली सुनेला सदा. ३२

न्हाई मी जरि सात आठ दिवशीं, तीशीं न बोलाविलें,
ह्याचेंहि तिजसीच दूषण सदा! मी बाइ! तें लाविलें.
माझें ऐकत नाहिं कांहिंच, असें बाळ्यास सांगीतलें,
त्यानें मारुन तीस बेदम, अहा! खोलीमधें कोंडिलें. ३३

बाई ! भांडण कारणाविण करूं फावे मला. सासवे,
बोलोनी कटु शब्द, काढिलिं तिच्या डोळयांतुनी आसवें.
कज्जा नित्य करीतसें, सकल मी लज्जा अहा ! सोडुनी,
तोन्यानें फिरुनी सदैव सदनीं, बोलेंच हांसोडुनी.' ३४

ऐशा रीतीं छलमय तिनें काढिलीं पांच वर्षें,
हर्षे तिंचे मम मन, जसें तीवरी दुःख वर्षे.
बाई ! होती सुदृढ तरुणी यद्यपी ती वयानें,
त्रासातें ह्या सहुनि, तिजला गांठिलें हो ! क्षयानें. ३५

झालें, तीतें दृढ पकडिलें कालरूप क्षयानें,
नाहीं कांहीं कधिंहि वदली हाय ! माझ्या भयानें.
गेली, गेली, गुणगणवती, सौख्यदाती, सुशीला,
पश्चात्तापीं बुडवुनि मला पापिणीला अशीला. ३६

केलें नाहीं कवतुक कधीं पांच वर्षांत तीचें,
हालातें म्यां करुनि, हरिले प्राण अंतीं सतीचे.
हें हो ! सर्व स्मरुनि, जळतें चित्त माझें सदाही,
बाई ! आत्मा तिळतिळ तुटे, दुःख देहास दाही. ३७

'मोठ्या खोट्या छळक कुमती बोलती दुष्ट वाचा,'
बोभाटा हा उगिच न जगीं गाजतो सासवांचा.
बाई ! माझ्यापरिस असती सासवा खास लोकीं,
देवा ! आह्मीं अवनिस खऱ्या भार ह्या जाहलों कीं. ३८

देई,देवा ! सुमति जगतीं सासुंना सर्व नित्य,
सत्याची त्यां अभिरुचि जडो, ना घडो दुष्ट कृत्य.
सौख्या लोकीं अनुभवुत ह्या सर्वदाही सुनाही,
ज्यांना सध्या मिळत बहुधा गोडसा शब्द नाहीं. ३९

१२. शोकक्षोभ.

(पृथ्वी छंद.)

वसंत कुसुमोद्गमें मदनमित्र हा रंगला,
निशापतिसवें निशा विमल शोभते मंगला,
सुगंध लुटितो सुखें पवन मंद पुष्पांतला,
सुरोपवनसाम्य ये सुसमयास या क्ष्मातला. १

न दाह अणु राहतो, विधु करी सुधास्यंदन,
महीतनुस चर्चितो निजकरें जणूं चन्दन.
जळाशयजळीं उडुग्रहशशी भले रंगले,
जणूं गगनभाग हे वरुनि भूतळीं भंगले. २

परी समय अंतका ! तुज असा कसा लाभला ?
गृहांत मम घालण्या अवचितांचि घाला भला.
शिरोनि अदया ! खला ! न कळतांचि चोरासम,
कसें सदनरत्न हें सहज चोरिलें त्वां मम ? ३

सखी, नयवती, दयागुणवती, सुशीला, सती,
तुवां अहह ! चोरिली, मजासि देवुनी लास, ती.
मनस्तिमिरनाशिनी शशिकला निमाली, अहा !

प्रिया न हरिसी, यमा ! मम बहिश्चर प्राण हा. ४

तितीर्षु शिरलों बळें भवविशाळसिंधूदरीं,
परी अद्य सत्वरीं यम हरी सुभार्या-तरी !
गरागर फिरीवितो मज मनोरुडावर्त, रे !
सुदीन, बळहीन, हा भयविलीन कैसा तरे ? ५

सखीसहित अंतरें मज मनःसमाधान तें,
निधान, मम मानही, हरपलें, सुखस्थान तें !
सखा परम भंगला, सदनदेवता मंगला;
मला विजन जंगलासम गमे भला बंगला ! ६

वसंत उधळी असा सुमनसां, रसा ही नटे,
विटे मन परंतु हें, सुखपयोनिधी ओहटे.
जरी कुसुमवृक्षहो ! सुमभरें बरे डोलता,
फुले हृदयवृत्ति ही मम न, जेविं वंध्या लता. ७

न वायु मज भासती सुरभि पुष्पगंधामुळें,
वपू सळसळे मम प्रखरशा उसासें, उले.
रसेवर असे रसें धवल शीत ही चंद्रिका,
न हंत ! परि ती हरी ममःस्थिता तंद्रि कां ? मनः ८

प्रफुल्ल मुख, केश ते असित शोभले ज्यावरी,
जणूं मधुपसंहती सुरभि शुभ्र कंजा वरी !
परी मृतिकळा अजी पसरुनी तयाच्या वरी,

हरी मम धृती, करी हृदयवृत्तिला बावरी. ९

प्रसन्नमुखभा सखे ! विटुनि, लोपली चित्कळा,
करी फटफटीत ही स्फटिकशी मृतीची कळा.
मिटोनि तव लोचनें, गमासि तूं समाधिस्थ, गे !
प्रशांतहि तुझ्या मुखा निरखितां धृती ना तगे. १०

सहर्ष धरिली तुवां निजाशिरीं मदाज्ञा मुदें,
तसें न वरिलें भले ! रुचिरवर्तने ! त्वां मुदे.
परी अळवितां अजी दयित नाथ हा, कामुके !
मुळीं न वदशी कशी ? वदन होय हा ! कां मुकें ? ११

अतीव रुचले तुला गुण; न ते, अलंकार जे;
न चित्त तव दूषिलें सखि ! कधीं कुशंकारजें
असे तव सदा, 'वदो मज सखा,' परी काम हा;
अजी सुमणि जाहला निरस खापरी का महा ? १२

मृदू कचकलाप हा विखुरला कपोला, पहा;
प्रिये ! पदर सांवरीं, भ्रम तुला पडे काय हा ?
अहा! भ्रम तुला न; गे ! मजाचि तो पडे, सुंदरी, !
विनीत, अविनीत वा, तुज समान दोन्ही परी. १३

त्यजूनि मजसी, तसें सकल आप्तवर्गी जनां,
करीसि गमनास, हें अनृत भासलें मन्मना ;
तशांत तनु ही तुझी बघुनि चित्त मोहें भ्रमे,

सजीव तुज कल्पुनी, अविनयें प्रिये! मी भ्रमें. १४

विवर्ण अधरोष्ठ हा मज गमे हले या घडी,
मधून मग भासते हलुच वाजली बांगडी;
तरंग उठती असे,क्षण मनीं भरे उत्सव,
त्वरें सकळ तो विरे, पसरतो निराशोद्भव! १५

किती वदनपांडुता!सकल रक्त हें आटलें.
शरीर किति थंड हे! अवयव प्रिये!ताठले.
मधून मृदु वायु हा करिशिरोरुहां चंचळ,
सजीव गमसी, मनीं मग भरोनि आशाबळ ! १६

सरोजमृदु अंग हें, दडदडीत ही घोंगडी ;
गडे ! अहह ! हा घडे उलट योग कां या घडी ?
परंतु तिरडीवरी निरवितील गे! काय हा,
विरागिजनही तदा न म्हणतील गे!काय'हा' ? १७

न काढिति तुझी तनू अजि गृहांतुनी सुंदरी !
उसूंस मम खेंचिती असुर हे तनूबाहिरीं !
दिसे सदन शून्य हें,गुततेंच मायातमीं,
गडे! धेंडपडें, पडें, दृढ अडें, बुडें यांत मी. १८

म्हणालिस, 'अखेरिच्या हळदकुंकवातें घरीं
करीन,' तरि आणिलें सुमदलांस नानापरी.
परी तदुपयोग हा, आजि घडेल निर्वापणा,

न दैवलिखितास ये फिरविता कधीं आपणां ! १९

तुझी सुतनु अंतिमा हळदकुंकुमा लाभली,
गळ्यांत सखि! घातली तुलसिपत्रमाला भली,
अखंड वलयें, फुलें, वसन पीत, हीं जोडवीं.
तुझें विपुल पुण्य हें तुज सतीयशा जोडवी. २०

न ही हळद लाहली तुज, परंतु हालाहलीं
मदीय तनु नाहली, प्रखर जाहली काहली,
सकुंकुम न ही तुझ्या तुलसिपत्रमाला गळीं,
सशोणित मदीय ती असिलता गळां लागली. २१

न ओटिंत तुझ्या सखे ! रुचिर घातलें श्रीफळ,
शिळाच मम ती शिरीं ! सकळ जन्म हा निष्फळ !
सदा सुजन बोलती 'अमितमंगळ श्रीफळ,'
अमंगळचि जाहलें ! विकट दुर्विधीचें बळ ! २२

करी तुज न शीतही उदक कां प्रिये ! त्रास तें ?
अहा! खचित मूढ मी, स्वमतिही मला हांसते !
चिताज्वलन दाहही तुज जरी अजी सोसती,
कथा हिमजलाचि ती मग कितीक भासो ? सती ! २३

जिव्हा कवळिलें सदा सपुलकीं रसें ज्या करीं,
रचीति करतेच हे अधम लांकडें तीवरी !
गणूनि जिस जीविताधिक विसंबलों ना कधीं,

स्वतां दहन ती करूं तनु कशी चिताग्नीमधीं? २४
न पुण्य मम होय तें, दिसत जें तया लांकुडीं,
अखेरिस शिवे तुझी सुतनु! हंत! याला कुडी.
सुखी खचित मानितों, जरिहि काष्ठ होतों, गडे!
तुझ्यासहित जें पडे दहनिं, दग्ध तैसें घडे. २५

स्मशान जरि सोडुनी परतलों, न होई चिता
अदृष्ट, नयनापुढें धगधगे सदा निश्चिता!
न येइ मन, हें जरी मम शरीर आलें घरीं,
चिता तव तनूसवें हृदय भस्म माझें करी! २६

सचक्षु असुनी दिसे न मज, जाहलों अंध, हा!
तुझा विरह तोडितो सकल सौख्यसंबंध हा.
तरंगसम चंचळा अखिल संसृती, हें कळे
परी उमळतें मनीं, करुनि यत्नही नाकळे. २७

भरे उदक लोचनीं स्मरुनि ती, सदाकाळ जी
मदर्थ शिणुनी तुवां प्रबळ वाहिली काळजी.
न रूप बहुमानिलें, सुगुण मात्र हें मानसें.
असे गुणगणास, तें अमित मोल हेमा नसे. २८

किती विलसती, सती! तव गुणां खुणा दाविती,
बघून मन त्यां जळे, उमळुनीहि येतें किती!
मना. सतत मोहितीं परसलीं तुझीं स्मारकें,

सखे ! गुणचि ते निके रडविती अशी सारखे ? २९

प्रभातिं मज संप्रती उघडितां स्वनेत्रां, कधीं
दिसे न मुख सास्मित प्रमुदित प्रिये ! सन्निधीं.
मृदु स्वर वदे न वा 'अजुनि कां न निद्रा पुरे?'
खरें सकल लोपुनी, स्मृतिज मात्र आतां उरे ? ३०

सदा मुदित वृत्तिनें स्वगृह कर्म आटोपलें,
प्रसन्न तव चित्त ना कदाचितही कोपलें,
वचें सुखाविलें सदा मधुमयें शुभें कोमलें,
हृदब्ज फुलें भलें न दिसलें कधीं कोमलें. ३१

धुवोनि तनु उज्वळा, विमल नेसुनी अंचला,
शिरीं तिलक लाविला, अवरुनी कचां चंचळां,
समोर तव मूर्ति ती जणुं दिसे मला लोचनीं
असे बसलि पूजण्या तुळस रम्य वृंदावनीं ! ३२

समीप गडवा, गडू, सजळ अर्घ्य, नीरांजन,
सकुंकुम करंड तो, सुरभि पांढरें चंदन,
सुरेख गुडपात्र तें, तबक, त्यांत पुष्पें दलें,
सुभक्तिमणितें असे हृदयकोंदणीं कोंदलें. ३३

'असो पति सुखी,' अशी तव असे शुभा मागणी,
यशोद्युतिगुणें खरी अससि रत्न भामागणीं.
कसें 'अससि' बोललों ! भ्रमतसे मती ही मम,
सती मज अलभ्य ती अघनगास मुक्तीसम. ३४

फुलें, सुबक आसनें, गळपटे, चिजा बारक्या;
क्षणक्षण न जाचती परि दुज्या तयांसारख्या.
व्यवस्थिति घरांत या तव गुणांस दे साक्ष, ते
करी हृदयिं जीं, न तीं शमविते सुषुप्ति क्षतें. ३
सुषुप्ति मज दाविते असह नित्य दुःस्वप्न ते,
समूळ खणितात जे अहह ! मन्मनःशांतते.
कधीं अनुभवीन गे ! सरस रम्य सुस्वप्न मी;
तरी त्वरित जागृतीं ढकलि दुःखशोकभ्रमीं. ३
जगांत असुनी, सखे! तुजविणें जगावेगळा !
सजीव असुनी, गमे सकळ लोपली चित्कळा !
स्वतंत्र असुनी, कसा जखडलों गुलामासम ?
प्रकाश असुनी, दिसे मंज समस्त माजे तम. ३
असे हृदय शून्य, हो ! विजन सर्व झालें गृहीं,
सशोक गतसत्व ही विरस भासते हो ! मही.
नसे मजासि संगती, पसरला तमोभार हा,
सुमित्रसम तूं तरी मम समीप, शोका ! रहा ! ३

१३ अजविलाप.

(वियोगिनी वृत्त.)

अज साश्रु करी विलाप हा, स्थिरधोर प्रकृती विरे पहा,
वपु मानुष काय आपलें? वितुळे लोहहि फार तापलें.
जरि जीवन तत्क्षणीं शमे कुसुमांच्या सखि! गात्रसंगमें,
तरि काळ जिघांसु जों असे, न तया होइल शस्त्र कायसें?

अथवा मृदुवस्तुनाशना
  करि मृत्यू मृदुवस्तुयोजना.
कमला हिम मृत्यु देतसे
  उचितोदाहरणार्थ हें असे. ३

जरि ही असुघातिनी स्वज,
  मदुरःस्था वधिते न कां मज ?
अमृत प्रखरा विषा करी,
  अमृता वा विष, सूत्र ईश्वरी. ४

अथवा मम पाप पाहुनी,
  विधि झोंकी अशनी नभाहुनी.
तरु रक्षुनि. तो तदाश्रिता
  निवटी केवळ कोमला लता ! ५

अपराध जरी करीं पुरा,
  तरि झालीस न निष्ठुरा पुरा.
मग आज नसोन दोषही,
  बससी काय मुकी सरोष ही ? ६

'शठ हा अज, सत्यभाव ना,'
  तव चित्तीं अशी होय भावना;
ह्मणुनी, न मला विचारितां,
  पर लोका वरिसी शुचिस्मिता ! ७

क्षण मूर्च्छित, होउनी सखी–
सह तूं जाउनि, तीविणेंच कीं
परतें फिरलेंस कां ? मना !
सह आतां पविपातवेदना! ८

सखि ! विप्रियकल्पना नसे
मम चित्तीं, मग टाकिसी कसें ?
अज भूपति नाममात्र हा,
तव ठायीं दृढभाव हा, पहा. ९

कुरळे, मृदु, भृंगनील, जे
सुमसंस्कारित, केश ते तुझे
हलु चाळवितां समीरण,
पुनरुज्जीवन शंकितें मन. १०

उठुनी सुदति! त्वरें, तरी
मम अंतःस्थ विषाद संहरीं;
जाशि ते तम दिव्य औषधी
हिमशैलीं दडलें गुहेमधीं. ११

कच हालति ज्यावरी, तुझें
मुख हें नीरव दे मनोरुजे;
स्फुरती न अली जयीं रसें
निशि सुप्तांवुज काय हें असे ! १२

रजनी शशिला दिसे पुन्हां,
दयिता द्वंद्वचरा पतत्रिणा,
तरि सह्य वियोग त्यां गमे,
विरहें शाश्वत मी तुझ्या भ्रमें. १३

नवपल्लवतल्पही भला
तनुला ज्याच कठोर लागला,
कशि तीच चिताधिरोहणा
सहणारी वद हंत! या क्षणा ? १४

मृत तूज बघून मेखला
तव एकान्तसखी सुमंजुला
गतिविभ्रमभंग पावुन
मृततुल्या पडलीच निःस्वन. १५

कल मंजुल शद्ब कोकिलां,
मदमंदा गति राजहंसिला,
हरिणींस कटाक्ष उत्तम,
पवनाधूत लतांस विभ्रम ; १६

गुण अर्पिसि हे मदर्थ कीं,
परलोकोत्सुक तूं प्रिये! सखी!
परि सांवरती न ते मन
उलटे भ्रांतविती क्षण क्षण! १७

फलिनी सहकार जोडपें
जुळवोनी दयिते! महाकृपे!
न करून विवाहमंगला
त्यजिसी, दंडक हा न चांगला. १८

सुम देइ अशोक हा यदा,
पुरवीलेंस यदीय दोहदां,
तव त्या कचभूषणा कसें
वद अर्पीन निवापमाल्यसें? १९

तव दुर्लभ नूपुरध्वनी
चरणानुग्रह आणुनी मनीं
कुसुमाश्रुजला अशोक हा
वितरोनी करितोच शोक हा! २०

बकुलस्रज अर्ध गुंफली
तव निश्वाससुगंधि चांगली,
तशि अर्धवट स्रजून ती,
निजसी कां करभोरु! संप्रती? २१

समदुःखसुखी सखीजन,
प्रतिपच्चंद्रसमान नंदन,
दृढ शुद्धरतीहि मी; परी
बहु तूं निष्ठुर दाविसी परी! २२

न रती, धृतिलेश हाय! न,
  कसला हा ऋतु, काय गायन?
न अलंकृतिचें प्रयोजन,
  शयनादी मम होत निर्जन! २३

गृहिणी, सुसखी, मनोबळ,
  प्रियशिष्या, सचिवादि मंडळ,
हरितो यम सर्व; काय वा
  न हरी तो, तुज नेइ जेधवा? २४

रसवत् मधु मन्मुखातलें
  मृगशावाक्षि! सदैव चाखलें,
तरि केविं मदश्रुकश्मल
  परलोकांत पिशील हें जल? २५

जरि राज्य सुखादि दीसती,
  अजसौख्यें सरलीं खरीं सती!
मति ही विषयीं न लोभली,
  मम सच्छर्मनिधान तूं भली. २६

प्रेमाची ओवाळणी.

(साकी.)

भाउबीज आज ह्मणोनी लांबलांबुनी बंधू
प्रिय भगिनीतें येति भेटण्या, उचंबळे सुखसिंधू. १

उल्हासानें फार आदरें सत्कारुन तयांना,
भोजन भगिनी घालिति, करुनी नाना पक्वान्नांना. २

उल्हासानें बहु आशेनें सत्काराया मजला,
करुनि तयारी सर्व, जीव तव असेल मोदें सजला. ३

असे ज्ञात तव ताइ! मज तें प्रेम, तसें शिवशील,
उत्कंठेनें नेत्र लावुनी वाटेला बसशील! ४

परंतु आला नाहीं ह्मणुनी अपुला हा प्रिय बंधू,
निराश होउनि तव गालावर गळतिलही जलबिंदू. ५

हस्ततलावरि कपोल कोमल, ठेवुनि तूं निश्वास!
टाकुनि, ह्मणशिल, 'कसा धरावा, भाऊचा विश्वास?' ६

प्रेमभरानें स्मरण होउनी, हृदय तुझें उमळेल,
पंकज पंकीं, कज्जलवारिंत तेविं मुखाब्ज मळेल! ७

न परी मानीं अंतर पडलें ताई! कांहीं प्रेमीं,
उदरंभरणीं कार्यपरत्वीं गुंतुन गेलों गे! मी. ८

मी न जरी गे! आलों, तरि ही प्रेमपत्रिका माझी

कुशल कळवुनी प्रेम अढळ मम दाविल तुजला आजी. ९
खरें प्रेम त्या अंतर किंवा काळ न येतो आड,
पवनगती तें, उदधिगिरींचा नाहीं त्याला पाड ! १०
सात समुद्रां ओलांडुनिही भेटे तें निज विषया.
तव मूर्ती तें आणी भगिनी ! पुढती मम या समया ! ११
प्रेमसमृद्धी हीच जगीं या थोर असे श्रीमंती,
विश्वाचें तें जीवन, तत्सम न कनक, वाजी ,दंती. १२
प्रेमग्रंथी कुसुमासम हा नाजुक ताई ! आहे,
परंतु तो या विश्वीं सकळां जखडुनि दृढतर राहे ! १३
दूर जरी मी, तरि मन माझें येउनि पत्रासहित
ओंवाळणि तुज घाली, ती त्वां घ्यावी हेंची विहित. १४
रक्त सुमनसंह सुवर्णमाला सद्गुणबद्धा तूतें
अर्पितसें, ती स्वीकारुनि मम पूर्ण करीं हेतूतें. १५
जाण असे ही सये! पत्रिका मत्प्रेमाची पुतळी,
हीहुनि तुजला अधिक न भासो मात्र कांचनी पुतळी ! १६
अखंड राहो मजवरती हा लोभ तुझा सम ताई!
ईशकृपेनें कधीं न यो तव भाग्यसुखीं कमताई. १७

१८ वसंतवैभव.

(श्लोक)

हुताशनीच्या दहनांत दाहला,
विनष्ट तेणें शिशिरर्तु जाहला,
त्यजोनिया दक्षिणदिङ्नभःपथा
उदक्पथें हा फिरवी रवी रथा. १

उभारितात ध्वज हे घरोंघरीं,
नवाब्द पूजा करितात आदरीं,
ध्वजांस सद्गंध समीर हालवी,
जणों वसंतास सलील पालवी. २

'असोंचि वासंतिक दूत मी जनीं,
याया निघाला ऋतुराज मद्वनी.
संगें तयाचा परिवार फार तो.'
पुकारुनी कोकिल हें भरारतो. ३

करोनियां वेश निकाम सुंदर
स्वभाव शोभा सुखकेलिमंदिर,
स्वयें सखा संत वसंत भूतला

नवाब्द सत्कारानिमित्त पातला. ४
जिनें विपत्ती शिशिरांत साहली,
अजीव ती सृष्टि सजीव जाहली,
नटे वनश्री कुसुमाकरासवें,
प्रियासवें कीं युवती महोत्सवें! ५
लता सलीला सजतात पल्लवें,
तरूच्चय स्वादुफलार्थवत् लवे.
विलेखिलें ज्यावर पुष्पमोहरा,
त्या शालुनें सृष्टि दिसे मनोहरा. ६
जाळी जुईची, निशिगंध हीं कुडीं,
झेला कुडा, रम्य गुलाब राखडी,
सुवर्णकांती शिरिं केतकी घडी,
आरामभू हा करि साज आवडीं. ७
पथीं फलांनीं तरु ज्यास तर्पिती,
जया सुमार्घ्य व्रतती समर्पिती,
तो हा विहंगध्वनिनें स्थिरावला
टाकी वसंतानिल मंद पावला. ८
सुमंद आनंदन गंधवाह तो
गंधप्रवाहासह सौख्य वाहतो.
लतावधू होउनि नम्रवर्तना

तदीय शिष्या शिकतात नर्तना. ९

वेली मनोज्ञा मृदु लोकशील या
जों नर्तनारंभ करीति लीलया,
तरुस्थ तों सुस्वर दिव्य गायकीं
आरंभिलें गान रसज्ञनायकीं. १०

मरंदमत्त श्रितपद्मकेशरीं
कृष्णालिही लाहुनि वर्ण केशरी,
गुंजारवा गाउनि कर्णवैभवा
प्रशंसती मंगल माधवोत्सवा. ११

बालद्रुमीं पुष्पित वा लतागणीं
नाचे प्रमोदें फुलपांखरूं झणीं,
मांडोनिया रंगित रम्य खेळणीं;
खेळे जणों बाळक हें गृहांगणीं. १२

आम्रादि भारावुनि मोहरांनीं
खगालिला घालिति मोह रानीं.
प्रच्छायशा वृक्षतळीं खिलार
रोमंथ सेवी घडतां दुपार. १३

सुरापसे एकफलार्थ कावळे
फलाढ्य वृक्षीं लढतात बावळे;
मूढत्व त्यांचें निरखोनिया करी

सितप्रसूनस्मित बाल मोगरी. १४

सुगंधशा हेमतरुप्रसूनिं या
ही झेंप केली मधुपें फसूनिया,
तरीं न त्याला मधुलेश लाभला,
भोळा निराशेंत निवेशला भला. १५

करोनियां कुंकुमलेपना तनू,
प्रचंड शाखाकर हालवी जणूं,
अशोक नाचे अधुना विचित्र यां
हसल्लतांपुष्परदां पहावया. १६

धरोनि तारा निशिं आपल्या करीं,
करी विहारास शशी नभःसरीं.
परी चिरक्रीडनजश्रमाकुला
जणों निशांतीं भ्रमतात कोमला. १७

पाहोनि वासंतिक काल निर्मल,
प्रसन्न लक्ष्मीपद पूर्ण मंगल.
सीतापती सद्गुणभूमि, सन्मती,
वीराग्रणी, राम सभक्त जन्मती. १८

उपासनास्तोत्रपुराणकीर्तनीं
शुद्धें मनें रंगति भक्त नर्तनीं.

वाद्यें विचित्रें ध्वनती अपारची,
ये भक्ति कीं मूर्त नव प्रकारची! १९
अभंगसौभाग्यसुखप्रदायका
देवीस आराधिति आर्य बायका,
धरोनि मांगल्यद पूर्व वाट ती
सतींस कुंकूंहळदीस वांटती. २०
सलील सायंसमयास बायका,
लेवोनियां मंगल वेश नेटका,
जातात ज्या मंदगती पथांतुनी
न लोचना उत्सव अन्य त्यांहुनी. २१
परी क्रमें ये क्षय या सुखकरा
ग्रासी वसंताप्रति निष्ठुरा जरा,
निदाघ जन्मे जगतीस दाहता,
संपत्तिची हंत! विपत्ति सांगता! २२
मधून धूम्रोपमवर्ण वारिद
वळोनि वर्षाऋतुदूत उन्मद,
उदीचिला गांठुनि चंडधामही,
अत्यंत उष्में उबवीत ही मही. २३
सरित्सरें अल्पजलेंचि जाहलीं,
परी शरीरें उदकांत नाहलीं!

अंगास अंगारसमान तापवी
क्रोधज्वलत्तापसतुल्य हा रवी! २४
वसंतलीला जरि नष्ट जाहली,
तरी पुन्हां ती परतेल भूतलीं.
जो बाह्यसृष्ट्यार्तिस घालवीं लया,
विश्वा पुन्हां तो मधु मोदवील या. २५

लतातरू, लेवुनियां नवीं दलें,
होतील हो! शोभित कीं फुलें फलें.
विहंग गातील, तशीं जनावरें
होतील सन्मोदसुखें अनावरें. २६

परंतु माझ्या हतजन्मभूमिची
जाईल का वेळ कधीं विपत्तिची?
झाले महात्मे मृत जे विशालधी
वसंत त्यांना उठवील का कधीं? २७

जाईल का हा हिमकाळ आळशी,
निद्राहि जी झोंबतसेचि काळशी?
सुचे न हो! उत्तर या सुसंगत,
असे निराशेंत मती दुभंगत! २८

१६ वर्षाकाळ.

(उमाछंद.)

व्यापिति मारुतचालित चण्ड पयोद अखण्ड नभःस्थळ तें
राक्षसलक्ष विलक्षण हें जग भक्षण काय करूं वळतें!
कांतिखनी गगनीं दिनराज विलुप्त असे जलभृन्निकरीं,
ध्वांत नितांत अनंत कृतांतसमान जगत्त्रयराज्य करी. १

दुंदुभितुल्य निनादति वारिद, गर्द अरण्यमही घुमती,
दांड, समीरण, दारुण निर्दय मंथितसे तरुराजतती,
मूळ तदा उमळून, वरून तरुण तरु किति कोसळती!
पुण्य अगण्य सरे ह्मणुनी जणुं नीचपदीं वरुनी ढळती! २

मत्त समीरण दे रग, हा तरुला करि लावितसे नटण,
शैल न सैल पडे, स्थिरपाद चळे स्थळ सोडुनियां तिळ न.
क्षुद्र मदांध चळे, उसळे, तरि शांतपणा न ढळे सुनरीं,
क्रोध सुबोधविरोधक सुज्ञ अगाध नर स्वहृदीं न धरी. ३

पर्वतमस्तकीं गर्वभरें ठरती वरती लघु अश्मकण,
हंत! समीरण संगतिनें पण भंगति, पावति ते पतन.
विस्मरुनी निज नीचपणा वरितात उगीच वरिष्ठ पदा,
क्षुद्र अरातिहि लोटिति त्यांस, अलोट तशा वरिती विपदा. ४

वर्षति वारिद भीषण भरत, भूमिवरी नच रीघ सरी.

भासतसे जलवृष्टि न ही, शरवृष्टिच वर्षति सृष्टिवरी.
दर्दुर सर्वहि दुर्धर गर्वभरें कटुभाषण चालवती,
वर्षणनाद धुमे सकलत्र, विचित्र तरू शिर हालवती. ५

पावुनियां धृतिभंग, विहंग न रंगणिं रंगति हे गगनीं;
वन्य उदंडबल भ्रमती न तसे अति हिंस्र पशूंहि वनीं.
होउनियां हतसत्व समस्तहि सत्वर सत्व अजी दडती,
निर्भय मोर समोर समोद करी सुखनाद, नटे सरती. ६

प्राशुनि आप अपार असे वसुधा बहुधा बहु धालि खरी,
पंथ समस्तहि पाट अफाट तसे दिसतात पयोनिकरीं.
माणुस बाहिर येइन, सर्वहि होय मनांत भयार्त, पहा,
'देइं उघाड अगा! जगदीश!' ह्मणून करीति महाजप हा. ७

अंबरिं अंबद हे अवडंबर मांडिति, तें नयनीं बघुनी,
त्वेष मनीं चढुनी, जणुं नीरधि झोंकुनि दे जळ हें गगनीं;
दावि चमत्कृति उंच उचंबळुनी अचळासम वीचिचय,
फेनसितप्रभवस्त्रवसान कसा न जनां करणार भय? ८

नाद करी भयदायक दाहि दिशांस दणाणुनि सोडितसे,
उग्रभयाण असंख्य मृगाधिप ओरडती खररोष जसे!
हाय! अगाध पयोधिहि काय असा सहसा अधुना खवळे?
दुर्जनसंगतिनें अथवा नर सुज्ञ असोनिहि वायचळे! ९

श्रांत समीरण दांड अकांड सुशांत वनांतरिं होत असे,
खर्चुनि शक्ति निरर्थक भासत हा हतसत्व बनूनि बसे.
पोंच न ठेवुनि वेंचिति संतत अंधमती निजशक्तिधन,
होउनि सत्वर सत्वविहीन, दशा ति सदा पदरीं निधन. १०

शांत प्रभंजन होउनि, संततधार पयोधर सिंचितसे.

जेविं अपार उदार धनें नर, फार जलें घन वेंचितसे,
वृक्षदलीं जल शब्द करी, गिरिनिर्झर दाविति उग्र मदा!
स्थूलतनू सरिता करि तांडव, कामभरार्त जणुं प्रमदा! ११
फार उदार जसा नर निर्धन, होय तसा घन निर्जळ तो,
रम्य रवी मिरवी निजतेज तदा, अरिमाद जसा गळतो.
भासतसे विजयी रवि पाहुन विश्व सुखें मृदु हासत कीं,
होय सतेज सुफुल्ल मुखप्रभ हें वन, जाय दशा मळकी. १२
जेथ मिळे न निदाघिं जना जलबिंदुहि उग्र तृषाशमना,
तेथ किती जलपाट करोनिच नर्तन विस्मय देति मना!
अल्पधनें मतिमंद जनासम धुंद कसे बनतात पिसे!
सुंदर भूषण रम्य विनीतपणा धनिकास सदैव दिसे. १३
वृक्षसुवर्णदलोपरि सुंदररत्नपरी जलबिंदु निके,
वस्त्र बरें हरितप्रभ लेवुनि ही वसुधा नटण्यास शिके.
सूर्यकरीं रजतोपमदेह चकाकत धांवति पाट तसे,
पर्वतसत्पदवंदनकाम ससंभ्रम सर्वहि वाटतसे. १४
पाट न हे, गिरिचे सितपुष्पक हार विराजति छान खरे!
अर्पित तो स्वसखीस महीस, करी अति लाजुनि जी नखरे!
ते पतिदत्त मही सुमहार झुगारुनि देइ पयोधिमधी.
छे! वसुधे! पतिदत्तहि फेंकिसि, होसि खरीच तरी हतधी. १५
दीर्घनभोभ्रमणश्रम पावुनि पश्चिमदिक् कवळी द्युमणी,
रम्यसती बघुनी अति होय विरक्त, विचित्रचि हे सरणी.
रक्तकरीं रविच्या बहुरंग तरंगति अंबुद हे विभवीं,
तप्तसुवर्णसमप्रभबिंब बुडे सहसा जलधींत रवी. १६
व्यापिति मेघ असंख्य पुन्हा नभ, दाट जगीं तिमिरौघ भरे,

चंद्र न, तारकसंघ न, न ग्रह वावरते दिसतात बरे.
दुष्टविचारभरें भरलें जणुं दुर्जनचित्त गमे नभ हें,
क्रांत सुधाकर ज्यांत न, मित्र न, तारकसंगति ज्या न सहे. १७

ज्ञानमयोज्ज्वल दीपशिखा जशि खाणुनि टाकि मनोमळ ती,
गर्द तम क्षणमात्र तशी निवटी दिवटी चपला लवती.
नष्ट परी मग विद्युत होउनि, हें तम विश्व समस्त गिळी,
ज्ञानशिखा विझतां सहसा खळ मोह अनंत जनास छळी. १८

वर्षति मेघ, गमे वितळोनि समस्त नभस्तळ आज गळे!
उज्ज्वळ चंचळ विद्युत ही विलसे, नभ काय अपाप जळे!
गर्जति मेघ, दणाणुनि भूमि मधून गमे जणुं हादरते,
या अबलेवर विक्रम दाविति जे घन, मर्द बहादर ते! १९

१७ शरद्वर्णन.

(द्रुतविलंबितवृत्त.)

शिथिल इंद्रधनुर्गुण जाहला,
उजळते चपला न नभस्तला,
कडकडे गगनीं न महास्वर,
न घन वा घन वावरती वर. १

विमल विस्तृत सन्मन तें जसें,
नभ निरभ्र विशाल दिसे तसें.
निवटुनी जणुं त्या अहितांबुदा,
मिरवितें रवि तेज महामुदा! २

शरदिं होउनि पंकिलतालय,
सकल उज्वल हा जलसंचय.
स्वमुखदर्शनिं भाउनि लालसा,
करवितो रवि तो जणुं आरसा! ३

विमल नीलिमकांति शरत्स्थित.
पय विहाय विहारसोचित;

कनकहंस तयांत शशी भ्रमे,
कमलही मलहीन उडू रमे. ४

रुचिर, मंदगती, विशदान्तरा,
कमलरम्यमुखी, हरितांबरा,
पतिस भेटतसे पतिलीनधी,
सुरमणी, रमणीय, भली, नदी. ५

तिलशिरीषसुमें मन मोहती,
मधुर पीतविभा तृणसंहती,
फलति पूग सुरेख, फलाकरीं
सुनमिता न मिता तरुवल्लरी. ६

फलयवादिकसंचय जी करी,
सरस शारद शालुस जी वरी,
निरखुनी क्षिति ती सुमभूषण,
परम तें रमतें जनतामन. ७

फिरुनियां वनभूमित गोकुळें,
अमित भक्षुनि गोड तृणें दळें,
तरुतळीं बसती अति शीतळ,
रुचिरसें चिर सेवुनियां जळ. ८

मधुरधान्यफलादिकसेवनीं.
अमितमोद विनोद भरे मनीं,

विलसतें धरितां मग रंगण,
खगगणीं गगनीं मधुगायन. ९
तिलसुमस्रज सुंदर गुंफुनी,
सजवुनी बरवा महिलाजनीं,
शिवसतीभजनास्तव दोल हा.
वसविला सविलास गृहीं पहा १०
तरुदलास न मोल, तरी करी
दिवस एक तया कनकापरी;
ह्मणतसे जणुं तो दसरा स्वयें,
सुमत किंमत कीं समयास ये. ११
निजगृहांगण या नगरांगना
करुनि निर्मळ, रंगविती कणा,
भगणभाग नभासह रेखिती,
सुबकसा बक, सारससंहती. १२
उजळुनी बहु दीप गृहीं गृहीं
उडुगणावृत अंबरशी मही,
प्रतिपदीं सपदी दिपती जरी,
नयन 'हेय' न हें ह्मणती तरी. १३
सकल उष्ण जलें जन नाहती,
सुवसनीं नटती युवतीतती,

अरगजादि तनुप्रति लाविती,
सुरभि सौरभिं सौध धुमे किती! १४
अमृतसें सुरसान्न घरोघर,
विलसतें सकलत्र सदंबर,
विसरले जन दुःखद संसृती,
वसु रसा सुरसाध्यहि दाविती. १५
कडकडाट करीति फटाकडे,
उडति बाण सवेग नभाकडे.
सुरनळे, फुलबाजि घडीं घडीं
रजनिला जनिं लाविति आवडी. १६
सतत जो रततो धनसंचयीं
वणिज धूर्त धनाढ्य मितव्ययी,
करित तोहि अलंकृति आपणीं,
सुसमयासम या न दुजा गणी. १७
वितरुनी गरिबांप्रति खापरी,
करुनि उत्सव हे बहुतां परी,
धनचि पूजि धनी जणुं तत्वतां
धनसमा न समाश्रयदेवता! १८
भगिनिच्या सदनाप्रति सादर
सकल येति सहर्ष सहोदर.

प्रणयिनी भागिनी करिती, पहा,
मधुर साधुरसान्वित पाक हा. १९.
मग निरंजन त्या कुरवंडिती,
जणुं निरंजन भावचि दाविती.
वलयवस्त्र समर्पिति बांधव,
कनकदान कदाचित सोत्सव. २०



१८. बुद्धाचा उपदेश.

(शार्दूलविक्रीडित.)

शांतीचा पुतळा, दयामृतनिधी, श्रीबुद्ध, शुद्धाग्रणी,
जो या आर्यमहीमधें विलसला ज्ञानार्कचूडामणी,
तो एके दिवशीं वशीश्वर मुनी होता पथें चालत,
तों ये व्याकुळ बाष्पनेत्र वनिता कोणी तिथें त्याप्रत. १

ती स्त्री शोकभरें भडाडुनि रडे काढून दीन स्वर,
हातानें बडवी उरोमुख; गळे डोळ्यांतुनी पाझर;
दुःखानें भ्रमतां, नसे स्थळ जिला आशेस ठेवावया,
ती दीना नमुनी मुनीन्द्रचरणां लागे वदाया तया. २

"श्रीबुद्धा! तव लोचनांत वसते प्रत्यक्ष मायादया,
चित्तीं संतत मानितोस सकलां भूतांस दायाद यां.
देवा! या अबलेवरी वितरुनी कांहीं सुधेचे कण,
दावीं सत्य करून, होय वरिलें जें त्वां दयाकंकण. ३

देखोनी तव दिव्य भव्य मुख हें, ही सौम्य दृष्टी तशी,
देवाचा अवतार तारक खरा आह्मांस तूं भासशी.

बुद्धा! आदळली कठोर अशनी बा! काल माझ्या वरी;
माझा मावळला रवी, विकळ मी, दीना तमीं, सांवरीं ४
देवा! काल खुशाल बाल मम हा होता तृणीं खेळत,
माझें वत्सल चित्त त्यासह असे तेथेंच लोलंगत;
तों तेथें सहसा विशाल फणिनें वेंटाळिलें त्याजला,
त्याचा स्पर्श मुलास शीतल मृदू माळेपरी लागला. ५
बाळाला गमला भला गवसला खेळावया सौंगडी,
दातांची चवडी सलील उघडी, चोळी करें कातडी.
तों त्याच्या मृदु अंगुलींत अहिनें दंताङ्कुरां रोंविलें,
बुद्धा! तत्क्षण त्या जलाल गरलें माझ्या मुला गोंविलें. ६
किंकाळे शिशु; धांवलेंचि जवळी पोटागिची माय मी,
जाई पीळुनि आंतडें, भडभडे, पाहून बाळ श्रमी.
पोटाशीं धरिलें करीं कवळुनी, तोंडीं दिला मी स्तन,
हा! हा! हाय! परंतु बाळ न करी कांहीं स्तनप्राशन. ७
पान्हा ये मजला, परी तळमळे तान्हा, न लावी मुख.
तों देहीं विषवेग मस्त चढला, कोंडे रसीं घातुक;
शेजारी जन चांगले सभंवते गोळा बहू जाहले,
आक्रोशें मम दाटले गहिंवरें, दुःखाश्रुंनीं नाहले. ८
बोले एक, 'विषार फार चढला, येते पहा आंकडी.'
बोले अन्य, 'उपाय यास न असे, आली दशा वांकडी.'

बोले एक, 'पहा, कठीण लहरी येतात बालास या.'
बोले अन्य, 'कृतांतमूळ गमतें हें, औषधी कासया?' ९

बुद्धा! बोल न हे, विषासवचि ते कानांमधें तापले;
मानी मानस कीं न, बाळ सहसा हें अंतरे आपलें.
देवा! मी, पदरास या पसरुनी, बोलें, दया भाकुनी,
'माझ्या ओटिंत बाल हा जिववुनी घाला दयेनें कुणी. १०

मोठी यास नसे मुळीं जखम, हो! या, ही बघा अंगुळी,
आहे हें क्षत फार अल्प अणुसें, कोणी उगाळा मुळी.
हें निष्पाप लहान बाल, मग कां चावेल रागें अही?
द्या हो! औषध, द्या; अभागिणिस या दावा दया सर्वही.

माझा हा जळतो नवा मृदुलसा हा! हाय! वंशाङ्कुर;
राहा स्वस्थ असे न दीन वदनें होऊन दुःखातुर.'
ऐसें बोलुन, मी नमीं निज शिरें त्यांच्या प्रभो! पावलां,
झालें व्यर्थ परी; करींच मम या तो पिंड थंडावला! १२

तों बोले जन एक, 'गे! बघ, असे श्रीबुद्धनामा मुनी
पंथें चालत तो; तया जवळ जा, त्याच्या पदां वंदुनी,
ठेवीं बालकदेह त्याजपुढती, याची उपायाप्रती.
प्राणज्योतिस या तनूंत परती आणील तो संप्रती. १३

तेव्हां कांपत कांपत, प्रभुवरा! प्रेतास घेऊन या,
आलें ही तुझिया समीप, सदया! आतां करीं तूं दया.

बुद्धा! देवसमान दिव्य दिसतें बापा! तुझें हें मुख,
पाहीं बालमुखास, मी सरवितें बाजूस हें अंशुक." १४
झाला व्याकुळ बुद्ध काकुळतिनें जैसें जळीं ढेकुळ,
कीं, ती मानित, तत्प्रसाद मिळतां, निष्कुंठ वाढे कुळ.
वर्षे वाक्यसुधा बुधाग्रसर तो सप्रेमलीलाकला,
"बाई! बालकदेह नीट असुं दे वस्त्रामधें झांकला. १५
आधीं बाइ! बरी करीन तुजला, बालास त्यानंतरीं,
सांगें औषध, तें तुवां मिळवितां, होईन धन्वंतरी,
आणायास कथील वैद्यवर जी, ती वस्तु येतां करी,
रोग्याला उपचार तो करितसे, ही वैद्यरीती खरी. १६
जा तोळाभर तेल त्याच घरचें घेऊन ये सत्वरीं.
आई, बाप, मुलें, गुलाम अथवा मेला नसे ज्या घरीं,
हें तूंतें जर लाभलें, तर भलें झालें, असें मान, गे!
तूं डोळे भरुनी मुलास अपुल्या जीवंत बाई! बघें. १७
जा, बाई! घर कोणतेंहि बघ तूं, घेऊन तेलास ये,
नेमाचा परि पाहिजे न अणुही त्वां भंग केला, सये!
आई, बाप, मुलें, गुलाम अथवा ज्यांच्या न मेला घरीं,
तेथींचेंच, दुजें न, तेल गुण दे, हें वागवीं अंतरीं. १८
ही वाणी न, सुधाच साच सहसा वर्षे विचारीवर,
आनंदें शव घे, निघे मिळविण्या तेलास तोळाभर.

एकाकी पर तीं भ्रमून परती ये अल्प कालांतरें,
बोले बुद्ध मुनीस, अश्रु नयनीं आणून, दीन स्वरें. १९
"देवा! मी फिरलें घरोघर, भले शेजारवासी मला
होते देत समस्त तेल, धरुनी चित्तीं दया निर्मला.
प्रत्येकास विचारिला बुधवरा! हा प्रश्न मीं त्यावरी,
'आई, बाप, मुलें, गुलाम अथवा मेला न का या घरीं?'
तों प्रत्येक ह्मणे, 'उगाच भलता हा प्रश्न वेडे! कशा?
मेलेले बहु, अल्पमात्र जगती, मृत्यूस ही भू वशा.'
कोणी एक ह्मणे, 'सये! तुज दिलें हें तेल, घे हें करीं;
बाई! मृत्युकरीं गुलाम अमुचा गेला परी यां घरीं.' २१
कोणी एक ह्मणे, 'पुढें कर सये! तेलास तूं हात, गे!
बाई! हंत! परंतु एकहि न तें संतान माझें जगे.'
कोणी एक ह्मणे, 'खुशाल इतुकें घे तेल हें, साजणी!
बाई! हाय! गमावला पण असे गे! या कुटुंबी धणी.' २२
बुद्धा! यापरि लोक शोक करिती; लाभे न ती औषधी.
तेव्हां काय करूं? उठेल सुत हा कोठोन? कैसा? कधीं?
मृत्यू आत्मकरीं घरोघर करी हानीस नानापरी.
मी ही कां मग लाडकी? सुत तसा कां हा उठावा तरी?
ऐसा मी करुनी विचार, अपुला निश्चेत झाला सुत
द्राक्षावल्लिमधीं नदीतटपदीं तो ठेविला प्रस्तुत.

आलें धांवत ही पदांबुज तुझें सप्रेम मी चुंबुनी,
पाहाया स्थळ मृत्युहीन, मज तें दावीं, दयाळू मुनी!"

बोले बुद्धमुनी, "अलभ्य तुजला शोधावया लावुनी,
बाई! लाभुन तें दिलें तुज, चवी ज्याची न होते जुनी.
होता काल सलील देत तुजला आनंद जो नंदन,
तत्प्रीत्यर्थचि शोक आज करिती संगें तुझ्या हे जन. २६

बाई! दुःख विभागतांच हलकें होऊन जातें, पहा,
यानें होय तुझा त्वरें उतरला शोकाधिचा चेप हा.
आह्मी मानव ईशसूत्रवश गे! जें सूत्र हें, गूढ तें;
प्राणी दुःखसुखांत खात गिरक्या घेतो बळें मूढ तें. २७

हे अश्रू पुसुनी, सुखांत भरही घालावया आणखी,
बाई! वांचविण्यास बालक, तुझा जो जीव कीं, प्राण कीं,
माझें या हृदयांतलें रुधिरही कामास येतें, तरी
देतों हें; पण काय निष्फळ? नसे तें मानवाच्या करीं.
ज्याला आपण 'सौख्य, सौख्य,' ह्मणुनी सप्रेम कौटाळतों,
त्याचा मालक एकटाच दिसतो मातें जगत्पाळ तो.
मी हें ईश्वरसूत्रगूढ उकलूं बाई! प्रयत्ना करीं,
जा, तूंही मृतबालदेह भगिनी! जाळीं चिताग्नीवरी." २८

१९. शांतीचा शोध.

(दोहाछंद.)

शान्ति! देवि! तव बोल गे! कोठें रम्य निवास?
तुला शोधितां जाहलों आहें पूर्ण हताश! १

निर्जनशा गिरिकंदरीं मी केला तव शोध,
मनीं मानुनी सर्वथा तव संसारविरोध. २

एकाएकीं त्या स्थळीं घुसुनी झंझावात
ह्मणे, "मूढमति पामरा! न इथें शांति रहात." ३

'जा, जा इथुनी, मानवा!' दणाण गर्जे रान;
'सरसर, झरझर,' तें ह्मणे तरुशाखास्थित पान. ४

दरी सोडुनी चाललों, झालों मी वनपार,
जननीवियुक्त बाळसा भ्रमलों विगताधार. ५

तों नयनां गगनांगणीं दिसलें सुरपतिचाप,
मनास रुचलें शांतिचें स्थान तेंच निष्पाप. ६

शतरंगीं मन दंगलें, बसलों धरुनी ध्यान,
दैन्यभय क्षण भंगलें, सुटलें शरीरभान. ७

तोंचि अमितशत दुंदुभीसम कडकडले मेघ,
रेखी नयनविघातिनी विद्युत् गगनीं रेघ. ८

चळलों तत्क्षण मानसीं, शांति पळाली पार!
काय सांगुं जे जाचले चित्ता क्षुब्ध विचार? ९

तेथुनि मी मग धांवलों करुनीयां अतिवेग,
बहुशत केले यत्न मीं रोधाया उद्वेग. १०

शान्तिलिप्सुनें देखिलें म्यां सुंदर उद्यान,
जेथें होते रेखिले कुसुमताटवे छान. ११

शुक्लद्युति मधुगंध तें पुष्प जाइचें रम्य,
कोमलता शुचिशीतता पाहुनिया अनुपम्य, १२

हेंच वाटलें शांतिचें होय खरें माहेर,
नातरि ही रमणीयता कशी आंतबाहेर. १३

स्नेहोत्कंठित मी तदा गेलों कुसुमसमीप,
क्षणैक झालों, नंदनीं जसा सुखाढ्य शचीप. १४

सुमांतरीं म्यां पाहिलें मधुरप्रभ दलमूल,
पराग जेथें डोलती, परिमळ ज्या अनुकूल. १५

हातीं धरिलें पुष्प तें, मी रोमांचितकाय,
तोंच दचकलों मी, जणूं पडे अहीवर पाय! १६

परागसंघीं लोळती मर्मच्छेदी कीट.

हायहाय! सुम फेंकिलें मनांत भिनला वीट! १७

भ्रांतचित्त मी गोंधळें, व्यथितहृदय, निस्तेज,
दिसे कुसुमसम जेंचि, तें ठरतें कंटकसेज! १८

पथीं भटकतां, भेटला प्रवया नर मज एक,
शांतमुद्र जो भासला नयज्ञ मूर्त विवेक. १९

त्यास विनविलें प्रांजली, "भगवन्! सांगा साच,
कोठें शांती राहते? वारा सारा जाच. २०

गभीरदृष्टी तो मला वृद्ध निरखुनी शांत,
कुरवाळुनियां प्रीतिनें स्वकेश हिमनिभकांत, २१

देता झाला आदरें मज मुष्टीभर धान्य,
ह्मणे, "असे हें शांतिचें वासस्थळ बुधमान्य. २२

जा, जा, तरुणा! येथुनी, याचा रांध अपूप,
दाखवील बा! तो तुला श्रीशांतिप्रियरूप." २३

असें बोलुनी जाहला गुप्त जरठ सहसाच!
चकितचित्त मी तिष्ठलों, निवला न परी जाच.

शांते! शांते! देवते! कोठें गे! तव वास?
किंवा निकटचि राहुनी, करिसी मम उपहास? २५

२० खाणावळ.

जावोनी घनधूम्रपूर्ण सदनीं, पाहोनियां मंडळी,
वेगानें मग साधणें जरि असे जागा कुठें मोकळी.
नाहीं ठाव, तरी क्षुधेस वसणें गोंजारुनी विह्वळ,
धूम्रें पातित उष्ण लोचनजळें गालीं गळे ओहळ. १

होतांच जागा मग मोकळी ती,
मोद स्फुरे पर्वपयोधरीती.
ज्या वस्तु कष्टें पडतात हातीं,
तन्मूल्य लोकीं बहु मानिताती. २

काढुनी स्वसनें मग सारीं,
झाडुनीच नयनांतिल वारी,
बांधुनी त्वरित केश करानें,
पाय मोरिंत धुण्यास्तव जाणें. ३

करामध्यें तांब्या कळकट असा घेउनि तधीं,
भरावा तो पिंपीं खचित गमतें जें मळनिधी,
पदा ठेवोनियां बुळबुळितशा मोरिंत झणीं,
जलातें ओतावें; मग तुडविणें शेण चरणीं. ४

पुसाया पायाला कधिं न फडका तेथ मिळणें,

तरी ओल्या पायीं तिथिल मुकटा हातिं धरणें,
"बिचाऱ्या! तूं धूम्रें विटुनि, वदना कृष्ण करुनी,
कसा हा खुंटिला सतत अससी तूं लटकुनी! ५

त्वदंगावरी सांचलें बोट कीट,
तुला येतसेल स्वतालाच वीट,
बिचाऱ्या! तुला चार मासांत कांहीं
अजाऱ्यापरी वाटतें स्नान नाहीं. ६

गेली ही तव अंगकांति फिरुनी धूम्रें चुलीच्या किती!
पाण्याची तुजशीं कधीं न घडते वाटे मला संगती.
दुर्गंधी तनुला तुझ्या बहुत ये, देवा! नको ही स्थिती.
दैवाच्या वरि भार ठेविं, तुज बा! नाहींच अन्या गती.

असें त्वज्जिणें हें जरी सत्य खोटें,
तरी एक आहे तुझें भाग्य मोठें,
तुला स्पर्शती होउनी स्वच्छ सारे
जगीं लोक, हें चित्र आहे किती रे!" ८

असो, नेसोनीयां त्वरित मुकटा हा झटकुनी,
बसावें पाटाच्या वरति पदयुग्मा अखडुनी,
क्रमानें हीं पात्रें विलसतिल खाणावळींतलीं,
चिराट्याचा ज्यांना बघुनि मुरडो बहुत वली. ९

जो नेसे तोकडासा मलमय मुकटा सर्वदाही सुखानें,
ठेवी तंबाकुची जो सतत मुखिं बुकी चोळुनीयां करानें.
ज्याच्या त्या जानव्याला बसुनि मळपुटें रूप ये चामड्याचें,
ऐसा ये वाढपी हा, किळस बहुत ये पाहुनी रूप याचें.

धरी हा तमाखू मुखीं सर्वदाही,
मुखा घाण तेणें सदा येत राही.
तमाखूमुळें ओठ हे कृष्ण होती,
अहा ! त्यामुळें शोभते काय मूर्ती ! ११

क्षणभर झणि दावी नासिकामौक्तिकांनां,
झडकरि परि नेई भीतिनें आंत त्यांना,
परि कधिं कधिं हातीं चोरुनी घेउनीयां,
लपविच मुकट्याच्या आंत त्यां ठेवुनीयां.

सोसोनि ताप, बहु घेउनि धूम्र देहीं,
सेवोनी राख तनुची जधिं होइ लाहीं,
तेव्हां न वारि मिळुनी बनुनी तृषार्थ
हा धर्मबिंदु मुकटा असतो गिळीत. १३

असे स्वच्छत्वाचे तळपति भले रम्य पुतळे.
परावी पातेलीं बहु मिरविती, झेलित पळे.
पुढें आतां ताटीं ठरिव परिचें अन्न पडतें,

जयाला पाहोनी त्वरित अवधी भूक दडते. १४

पुढें दिसत भात हा, चंव नसे जयाला मुळीं;
तयांत वहु शोभते कठिणशा खड्यांची कुळी,
तशी चमकती कितीतरिच भातखंडें अहा!
असे सकल भोजनीं प्रमुखसा असा भात हा. १५

भातावरी वरण हें पिवळेंच आहे,
हा त्यांत डोळ दिसतो घन कृष्ण पाहे,
हे थोडके करपले बुडिं डाळदाणे,
त्यांच्या महापरिमळें गृह हें दणाणे. १६

रत्नाकरोदरिं जशीं बहुमूल्य रत्नें
हातास लागति सदैव अनंत यत्नें,
तेशा बुड्या बहुत आमटिच्या बुडाशीं
मारोनियां, मिळविणें तुरिच्या कणाशीं. १७

ती भोजनास असणार सदैव भाजी,
सुस्वस्त मार्किटमधें मिळते सदा जी;
ते सर्वदा तिखट तीस जरा करीती,
तेणेंकरूनि मग थोडकिशी खपे ती. १८

पुढें घरधनीण ये, गणिलि अन्नपूर्णा बुधें,
करांत चमचा जुना, कढत वाटि, हीं आयुधें;

उभाच चमचा करी, पडति थेंब भातावरी,
घृतप्रलय आवरी, भजकमानसा थावरी. १९

पुढें येई पोळी पदर तिजला तो नच मुळीं,
दिसे मध्यें काळी, हिरवटहि कांठास सगळी.
अशी पोळी खातां, तनुस विकृती खास जडते,
परी तीतें खाणें, शिव शिव! सदा भाग पडतें. २०

खळाळे तें शक्रा अलभ धवळें तक्र सरितें,
जलासंगें स्पर्धा रुचिरहित जें धीर करितें.
रसीं ऐशा भक्तां मिळवुनि, तया 'स्वागत' ह्मणूं,
न कां व्हावें सत्वप्रचुर मग आह्मीं दृढतनू? २१

अर्पी मी अन्नपूर्णे! तव पदकमलीं अल्प काव्यास भावें,
जोडोनी हस्तयुग्मा, विनतिस करितों पूर्ण तीतें करावें.
माते! खाणावळीचा धरु सुमति धनी, लोभ नाशास जावो,
विद्यार्थ्यांच्या सुदैवें मधुर सुरससें अन्न त्यां प्राप्त होवो.

२१. स्थित्यंतर.

(साकीछंद.)

मद्ग्रामाच्या सीमेवरती लघु पर्णकुटी आहे,
तेथें कोणीएक जरठ नर आत्मस्त्रीसह राहे. १
आजमितीच्या सरासरीनें पूर्वी वर्षें वीस
मिरवित होता हाच यौवनीं रूपबलप्रौढीस. २
वक्ष रुंद दृढ वज्रसारमय; दंड चंड पिळदार;
लोहकांब जणुं लांब कठिण पद, ज्यांना शक्ति अपार. ३
कालघनपटीं जी कांतिनटी, ती तन्नयनीं चमके;
कधीं न गमलें अंगबळाचें कार्य कठिण त्या अमकें. ४
परि कृषिकर्माकडे तयाचा मुळींच ओढा नव्हता,
रमे विनोदीं मिळवुनि अपुला वयस्यमेळा भंवता. ५
दुःखाचें त्या स्वप्नहि नव्हतें पडलें त्या सुखकाळीं;
चंचल गमली न ती युवस्थिति, जी त्याला कंवटाळी. ६
गर्वभरानें सर्वजणांना नित्यहि हा दरडावी;
उपकाराची संधी घाली हा बाहादर डावी. ७
याला मोहुनि याच्या हृदयीं सुरा जाहली राणी;

सुराभक्त हा सदा रंगला गाउनियां डफगाणीं
साहसांत कीं क्रूर कृतींतहि हाच पुढें शूरवर;
याविषयींची कीर्ति पसरली वाऱ्यापरि दूरवर.
गाजत होता वीरशिरोमणि केवळ वनचा राजा,
तहानभूकहि विसरे गुंतुनि हा मृगयेच्या काजा.
भव्यमूर्ति हा चापबाणधर वनांत जेव्हां जाई,
प्राणसंकटीं गुंतून पडे मृगकुळ ठाईं ठाईं.
याची लागे जरि यत्किंचित आसपास चाहूल,
कोलमृगकथा कैंची तेथें? थरथरती शार्दूल.
याच्या शिंगाशंखाचा रव दिशा पशूंहि विदारी,
शरासनीं जो शर, तो भासे धरणें घे यम दारीं.
अजून मृगयासक्त जनांचा ऐकुन गोळी बार,
दुर्बळही हा अंतर्यामीं स्फुरण पावतो फार.
भूभुःकार श्रवुनी कानीं वनांतल्या श्वानाचा,
उचल घेउनी दीन शरीरीं मांडी मानस नाचा.
हाय ! आज हें काय जाहलें स्थित्यंतर कष्टमय !
वाटे, काळिज फाटे, स्मरुनी तो पूर्वीचा समय.
गेलें गेलें तेज; ठेपलें ग्रहण जवळ खग्रास;
शैथिल्यानें पूर्ण गांजिलें केसरीस उग्रास.

नीरोगस्थिति लुप्त जाहली, विलसे न बलज्योत;
अंतरलें ह्या वयस्यमंडळ; उरलें ना गणगोत. १८
अपांग होउनि एक उरे हा पत्नीसह निःश्रीक,
भीक जरेसह येउन पिकवी बहु दुःखाचें पीक. १९
मल्लदेह जो लाथ हाणुनी खडक तडकवी नेटें,
तेथें सांप्रत यमकटकाचें कायम ठाणें थेटे. २०
नितळ अंग जें बळतेजाची केवळ मूर्ती होतें,
तेंच जाहलें कालकृतीनें सुरकुतलेलें पोतें. २१
शूरवरांही निजशौर्यें जो पूर्वी सारी मागें,
तोच आजला मनीं लाजला अबलाश्रित हा वागे. २२
अंगबळानें क्षुद्र मानिता सर्वां यौवनकालीं,
करुनी स्त्रीचें करावलंबन मान घालितो खालीं. २३
सर्व बळाला खर्चुनि जरि हें वृद्ध दंपती भागे,
तरी न लाभे त्यास अन्न तें, जें पोटाला लागे. २४
पर्णकुटीच्या असे भोंवती थोडेंसें परसाव,
काय परी तें त्या, हाणी ज्या रोगमंडळी घाव. २५
आज सकाळीं फिरतां फिरतां गेलों मी त्या ठाया,
दिसली एका तरुपाशीं ती जरठ वांकली काया. २६
करीं कुठार धरून होता हाणित तरुवरि घाव,
परी न होई त्या शस्त्राचा तरुत्वचेंत शिराव. २७

श्रमला, भ्रमला, वदनीं सुटले पाझर घर्मजलातें,
तत्स्थितिदर्शन चित्तीं आणी भडभडुनी मजला तें. २८
कंठीं गहिंवर, ये नयनीं जल, हृदयीं मम करुणा ते;
वदलों 'काका! कठिण कार्य हें करुं द्या मज तरुणातें.
तुमची झाली हलक तनु ही, कांपे थरथर कर तो,
बोत्र खलींसा, नगीं घाव हा संस्कारास न करतो.
काका! थांबा; कुठार मज द्या; मी होईन सहाय.
पाउ जिवापारीं या श्रमें न लावा घेऊं मानस हाय.' ३१
असें बोलुनी फार आग्रहें घेउनियां तें शस्त्र,
तीन चारची घाय हाणिले मीं सांवरुनी वस्त्र; ३२
तों त्या तरुसह वृद्धस्मृतिचें झालें अंतर उघडें;
स्वयौवनाचें चित्र चित्रिलें मनोदृष्टिनें सुघडें. ३३
काष्ठ भूमिवर, वृद्धमुखावर अश्रूचें जळ, गळलें,
स्मरणरवीनें ते हिमराशी विरुनी वाटे ढळले. ३४
कृतज्ञतेची मुद्रा वठली व्यक्तचि वदनावरली;
ऊर भरुनियां, अंतर वृत्ती वृद्धाची गहिंवरली. ३५
वर आकाशीं जलार्द्र नयनीं दृष्टि तदा लावोनी,
उभवोनी निज अस्थिचर्ममय सुकलेले कर दोनी, ३६
ह्मणे वृद्ध तो, "हे भगवंता! राख सुखी या तरुणा.
याच्या हृदयीं संतत पावो ही विस्तारा करुणा." ३७

२२. आशानदी.

(गीतिच्छंद.)

आशानदी भिगविते, कामजलानें तुडुंब, तोरा हे,
तो का निर्भय, तृष्णालहरींत जो मूढ डुंबतो, राहे ? १

करिते विहार येथें विकृतीची थोर घोर मगरी ती;
भ्रमती वरती, धरती यमकटकाची वितर्कखग रीती. २

उलटे सुलटे खळखळ कुटिलगती बहु तरंग सळसळती,
ढळती निश्चयतट, मग धैर्यद्रुम धडधडाट कोसळती. ३

मोहभ्रमणें दुस्तर गरगरती अमित भोंवरे तींत.
रोग व्यग्रफणी हे असती घालीत गोंव रेतींत, ४

धडपडत जीव असतां चिंतातट दाखवी पुढें कूळ,
दुर्गम तें दिसतांही विरवी बुडवून जेंवि ढेंकूळ. ५

आशानदी अशी ही प्रबळा नेई तळां अनेकांस,
हीपार तरायाला घालावी एक मुनिजनें कास. ६

शुद्धिपत्र.

पान.	पद्य.	पंक्ति.	अशुद्ध.	शुद्ध.
३	५	२	चालत्रितो	चाळवितो
५	२६	२	धाय	घाय
७	६	३	शिक्षूपणचें	शिशूपणचें
८	९	१	कापोलहि	कपोलहि
१३	१५	२	माझे	माझें
१५	३१	२	जननीं	जननी
२३	१५	३	मनुष्य देहावरी	मनुष्यदेहा वरीं
१४	१९	४	रची	रचीं
३५	१६	२	सतीव्रत	सतीव्रत
४२	२५	२	कष्टी	यष्टी
४२	३२	२	करी	करीं
४६	१५	४	तिजाशिं	तीजशिं
४७	२०	१	कशी	कशीं
४७	२०	२	वपुस	बापुस
४७	२२	२	असे	असें
५४	१६	३	करिशिरोरुहां	करि शिरोरुहां
५५	२३	३	दाहह	दाहही
६५	९	२	दाविल	दाविल
७२	३	१	मत	मत्त
७२	३	४	स्वहृही	स्वहृदीं
७२	४	१	°मस्तकीं	°मस्ताकें
९०	३	१	स्वसनें	स्वश्वसनें

श्रीबल्लाळविनायकग्रंथमाला.

१. प्रभुप्रसादन स्तोत्र कि. ०॥·

२. कवींचे बोल, (खंड १ ले), किं. ०५.

३. कवींचे बोल, (खंड २ रें), किं. ०५.

४. स्तुतिसारक स्तोत्र (मुद्गलपुराणांतील), किं. ०॥·

५. बा. अ. भिडेकृत फुलांचे झेले (स्फुट काव्यें), किंमत ०६.

६. एकनाथकृत गणेशपुराण (ओवीबद्ध) छापत आहे.

मुरूड-जंजिरा, प्रकाशक—चिं० अ० जोशी,

ता. १।३।१९०९. प्रो. श्रीब. वि. प्रिं. प्रेस.